सोलापूर
Solapur Tarun Bharat
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | बुधवार, दि. १० डिसेंबर २०२५ | वर्ष – ३ रे | अंक २४४ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | inbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### ठाकरेंच्या शिवसेनेचे आमदार संपर्कात!

**नागपूर :** शिवसेना ठाकरे गटाचे १३ आमदार संजय शिरसाट यांच्या संपर्कात असल्याची माहिती खुद्द संजय शिरसाट यांनीच दिली आहे. मत्या सगळ्या आमदारांची नावे माझ्याकडे आहेत. वेळ आल्यावर सांगेन, असं शिरसाट म्हणाले. संजय शिरसाट यांनी, ठाकरे शिवसेनेच्या कार्यपद्धतीला वैतागून शिंदेंच्या शिवसेनेत येण्याचा आमदारांचा मानस, असल्याचंही म्हटलं.

### शाळकरी मुलीवर लैंगिक अत्याचार

**पुणे :** पुण्यातील विश्रांतवाडी येथे शाळकरी मुलीवर लैंगिक अत्याचाराचा धक्कादायक प्रकार घडला आहे. अल्पवयीन तरुणीवर अत्याचार करणाऱ्या नराधमाला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. मुनाकिब नासिर अन्सारी असे आरोपीचे नाव आहे. ४ डिसेंबर रोजी हा सगळा प्रकार घडल्याची माहिती समोर येत आहे. अल्पवयीन मुलीच्या कुटुंबियांनी याबाबत पोलिसात तक्रार दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अल्पवयीन मुलगी आणि आरोपी हे एकमेकांना आधीपासून ओळखतात. ४ डिसेंबर रोजी आर–ोपीने तिला शाळेत सोडतो असे सांगितले आणि तिला त्याच्या गाडीवर बसून या तरुणाने जबरदस्तीने तिच्यावर अत्याचार केले.

### फडणवीस–शिंदे यांच्यात गुप्त बैठक

राज्यातील नगरपरिषद आणि नगरपालिका निवडणुका पार पडल्यानंतर आता लवकरच महाराष्ट्रातील रखडलेल्या महापालिका, नगरपालिका आणि जिल्हा परिषद निवडणुका लवकरच होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर सर्वच पक्ष तयारीला लागले आहेत. त्यानंतर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात आगामी निवडणुकांबाबत अत्यंत महत्त्वपूर्ण आणि सविस्तर चर्चा केली. यावेळी भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि आमदार रविंद्र चव्हाण उपस्थित होते. या बैठकीत महायुतीने महापालिका निवडणुका एकत्र लढण्याचा अंतिम निर्णय घेतल्याची माहिती समोर आली आहे.

# दानवेंचा ‘कॅश बॉम्ब’

**नागपूर :** नागपूर हिवाळी अधिवेशनाला काल सुरुवात झाली. आज दुसऱ्या दिवशी सकाळीच उद्धव सेनेचे नेते अंबादास दानवे यांनी मोठा कॅश बॉम्ब टाकला. त्यांच्या अधिकृत ट्विटर हँडलवरून एक व्हिडिओ शेअर करण्यात आला आहे. त्यात तीन व्हिडिओ आहेत. यामध्ये एका व्हिडिओमध्ये आमदार महेंद्र दळवी दिसत आहेत. तर इतर व्हिडिओपैकी एकात नोटांची बंडलं दिसत आहेत. विशेष म्हणजे द वरील पोस्टमध्ये अंबादास दानवे यांनी कुणाचेही नाव घेतलेले नाही.

अंबादास दानवे यांनी त्यांच्या एक्स हँडलवरून याविषयीची एक पोस्ट शेअर केली आहे. या ट्विटमध्ये त्यांनी सरकारला काही प्रन विचारले आहेत. हिवाळी अधिवेशन सुरु असतानाच त्यांनी हा व्हिडिओ शेअर केला आहे. त्यात त्यांनी कुणाचे नाव घेतलेले नाही. पण या व्हिडिओत एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे आमदार महेंद्र दळवी दिसत आहेत. तर दुसऱ्या व्हिडिओत नोटांची बंडलं आहे. हा एक व्हिडिओ कॉल असल्याचे समजते.

या सरकारकडे फक्त शेतकरी कर्जमाफीला पैसा नाही.. बाकी सगळं ओक्के आहे! जनतेला जरा सांगा मुख्यमंत्री फडणवीस आणि शिंदे जी, हे आमदार कोण आहेत आणि पैशांच्या गड्ड्यांसह काय करत आहेत? असा सवाल अंबादास दानवे यांनी सरकारला विचारला आहे.

हा एक व्हिडिओ कॉल असल्याचे दिसते. त्यात एकनाथ शिंदे यांचे आमदार महेंद्र दळवी दिसत आहेत. समोरील बाजूची व्यक्ती दिसत नाही. त्यात नोटांची मोठी बंडलं दिसत आहेत. या सर्व प्रकरणात आमदार कोण आहेत आणि पैशांच्या गड्ड्यांसह काय करत आहेत? असा सवाल दानवेंनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विचारला आहे.

# ‘सीएसएमटी’त शिवरायांचा पुतळा उभारणार

**नागपूर :** मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे स्थानकाजवळ लवकरच छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा उभारण्यात येईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी विधानसभेत दिली. ते म्हणाले की, मुंबई येथील रेल्वे स्थानकावर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा असावा, अशी मागणी यापूर्वीच्या अधिवेशनात आमदारांनी केली होती. याविषयी रेल्वे मंत्र्यांनी स्वतः मला पुतळा कुठे असेल, कसा असेल याचे सादरीकरण करून दाखवले.

# तुकाराम मुंढेंवरुन सभागृहात खडाजंगी

**नागपूर :** तुकाराम मुंढे यांच्याविरुद्ध लक्ष–वेधी आणण्यावरुन राजकीय वातावरण तापलं असून भाजप आमदार कृष्णा खोपडे यांनी आज विधानसभा सभागृहात तुकाराम मुंढेंच्या समर्थकांकडून आपणास बघून घेऊ, अशी धमकी आल्याचं म्हटलं. तसेच, सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांनी चुकीच्या पद्धतीने स्मार्ट सिटी प्रकल्पाचा अतिरिक्त पदभार आपल्याकडे ठेऊन घेतला होता, यासंदर्भात आपण लक्षवेधी दिली असून त्यामध्ये सविस्तरपणे लिहिण्यात आल्याचं सांगितलं. तसेच, त्यांच्यावरील लक्षवेधीमुळे आपणास दोन जणांनी फोन करुन धमकी दिली.

नागपूर अधिवेशनासाठी आलो असता, मला धमकीचे फोन आल्याचंही त्यांनी म्हटलं. दरम्यान, आज सभागृहात तुकाराम मुंढेंविरुद्ध आमदार कृष्णा खोपडे आणि आमदार प्रवीण दटके यांनीही तक्रार केली. तर, काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी तुकाराम मुंढेंची बाजू घेतली.










# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## तीळ पिकाचे प्रमाणित बियाणे मिळणार अनुदानावर

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ९ डिसेंबर :** राष्ट्रीय खाद्यतेल अभियान हे खाद्यतेलांच्या आयातीवरील भारताचे अवलंबित्व कमी करण्यासाठी देशांतर्गत तेलबियांचे उत्पादन वाढविणे आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न सुधारण्यासाठी राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत पिकाची उत्पादकता वाढ व सुधारित वाणांच्या प्रसारासाठी उन्हाळी हंगाम २०२५ करिता लातूर जिल्ह्यातील निवड केलेल्या लाभार्थ्यांना उन्हाळी तिळासाठी हेक्टरी अडीच किलो प्रमाणित बियाणे केंद्र शासनाच्या १०० टक्के अनुदानावर वितरीतकरण्यात येणार आहे. यासाठी प्रति लाभार्थी किमान ०.२० हेक्टर व कमाल १ हेक्टर मर्यादित लाभ देय आहे. शासकीय बियाणे पुरवठादार संस्थांचा तिळासाठी ५०० ग्रॅम किंवा १ किलो याप्रमाणे पॅकिंगसाईज आहे. शेतक-यांना बियाणाच्या पॅकिंग साईजनुसार प्रमाणित बियाणे वितरीत करण्यात येईल. त्यामुळे क्षेत्रानुसार आवश्यक बियाण्यापेक्षा पॅकिंग साईज नुसार अधिकचे बियाणे परिगणित होत असल्यास यासाठीची रक्कम शेतकऱ्यांनी स्वहिश्याने भरावी लागेल. उन्हाळी तीळ पिकाच्या बियाण्याचा लाभ घेण्यासाठी संकेतस्थळावर प्रमाणित बियाणे वितरण, प्रात्याक्षिके, फ्लेक्झी घटक औषधे आणि खते या शीर्षकाअंतर्गत सुविधा उपलब्ध करुन दिली आहे.



# लातूर मनपातील बनावट लिपीक भरती प्रकार मनपा निवडणुका लांबणीवर पडल्याचे फलित?

## असा प्रकार फक्त लातुरातच घडलाय की राज्यात अन्यत्रही याचा शोध घेणे गरजेचे!

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ९ डिसेंबर :** राज्यात मागच्या तीन साडेतीन वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका खोळंबल्या होत्या. त्या आता टप्प्याटप्प्याने घेतल्या जात आहेत. दरम्यानच्या काळात लातूर शहर महानगरपालिकेमध्ये मनपा आयुक्तांच्या बनावट सही शिक्क्यांच्या आधारे सहा जणांना बनावट नियुक्तीचे आदेश दिल्याचा धक्कादायक प्रकार उजेडात आला आहे.

या प्रकरणी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला असला तरी सातत्याने मनपा निवडणुका लांबणीवर पडल्याने असे घडले की यामागे आणखी कोणते कारण आहे? असे एक ना अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. तसेच असा प्रकार फक्त लातुरातच घडलाय की राज्यात अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांमध्येही घडलाय? त्याचाही वरिष्ठ पातळीवरुन शोध घेणे गरजेचे असल्याच्या प्रतिक्रिया सुजाण नागरिकांतून व्यक्त होत आहेत. लातूर शहर महानगरपालिकेच्या स्वच्छता विभागात कायमस्वरूपी सेवेत असलेले काही कर्मचारी आपल्या जागेवर अन्य रोजंदारीवरील कामगारांना कामावर ठेवून चालत असल्याचा प्रकार यापूर्वीच जगजाहीर झालेला आहे. त्यामुळे मनपामध्ये कधी काय होईल याची शाश्र्वती कोणीही देऊ शकत नाही, असे म्हटल्यास ते अतिशयोक्तीचे होणार नाही. त्यातच आता चक्क मनपा आयुक्तांच्या बनावट सही शिक्क्यांनिशी सहा जणांना लिपिक म्हणून आदेश दिल्याचा प्रकार समोर आला आहे.

शुभम बाळासाहेब गरड, ज्ञानेश्वरी रवी गरड, मारुती भगवान शिवणे, सोमनाथ लक्ष्मण पांचाळ, बापूराव कोंडीराम हुडे आणि आदित्य बंकट भिंगे यांना लातूर मनपात लिपिक म्हणून सेवेत रुजू होण्याचे आदेश मिळाले होते. आपल्याला मिळालेल्या आदेशाच्या सत्यतेबद्दल शंका वाटल्याने त्यांनीच मनपात माहितीच्या अधिकारात अर्ज करून मिळालेले नोकरीचे आदेश खरे की खोटे हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता या नियुक्त्यांची मनपात नोंद नसल्याचे निदर्शनास आले.

मनपाचे सहायक आयुक्त आणि आस्थापना विभागाच्या चौकशीत हे आदेश बनावट असल्याचे निष्पन्न झाले. याप्रकरणी मनपा प्रशासनाच्या वती-ने शिवाजीनगर पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली आहे.लातूर महानगरपालिकेत रस्ते, गटारी, स्वच्छतेची कामे बनावट होत असल्याचे अनेकांनी पाहिले-अनुभवले आहे. एकाच कामाची दोनदा बिले उचलण्याचा प्रकारही सर्रास घडल्याचे ऐकण्यात आले होते. पण चक्क आयुक्तांच्या बनावट सही शिक्क्यानिशी नोकरीचे बनावट आदेश देण्याचा प्रकार किमान आतापर्यंत तरी उघडकीस आला नव्हता. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मागच्या अनेक काळापासून रखडल्या आहेत. त्यामुळेही अशा प्रकारच्या घटना घडल्या असण्याची शक्यता नाकारता येत नाही. मध्यंतरी राज्यातील शिक्षण विभागातील बनावट शालार्थ आयडीचा मुद्दा चांगलाच गाजला. शिक्षण विभागातच अशा प्रकारच्या बनावट गोष्टी घडतात असे नसून त्या आता मनपा सारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांतही घडताना दिसत आहेत. त्यामुळे लातूरप्रमाणेच राज्यातील अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांमध्येही अशा प्रकारच्या बनावट ऑर्डर देऊन नोकर भरती केली गेली आहे की काय ? याची खातरजमा करण्याची पाळी आता येऊन ठेपली आहे. याप्रकरणी आता वरिष्ठानीच तात्काळ लक्ष घालून बनावट नोकर भरतीचे हे रॅकेट कोणाच्या अधिपत्याखाली चालवले जाते, अशा घटना अन्यत्र किती ठिकाणी घडल्या आ-हेत, याची सखोल चौकशी करण्याची मागणी सुजाण नागरीकातून केली जात आहे.

## धनादेश न वटल्याप्रकरणी आरोपीस सहा महिन्यांची शिक्षा



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ९ डिसेंबर :** सहा महिन्याच्या मुदतीसाठी घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीसाठी दिलेला धनादेश न वटल्याप्रकरणी लातूरचे प्रथमवर्ग ४ न्या. श्रीनिवास पांचाळ यांनी आरोपीस ४ लाख ३० हजार रुपयांच्या दंडासह सहा महिन्याची शिक्षा सुनावली आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, लातूर येथील हत्ते नगरचे रहिवासी तोशीब युनूस आलमेलकर (हा.मु.श्रीकृष्ण नगर, मळवटी रोड, मळवटी) यांनी राजकुमार नागनाथ कापसे यांच्या सिद्धेश्र्वर मनिलेंडर्स (शासनमान्य फायनान्स) कडून दि. २६ मे २०२० रोजी सहा महिन्याच्या मुदतीसाठी व्यवसाय व कौटुंबिक गरजांसाठी दोन लाख रुपयांचे कर्ज घेतले होते. या कर्जाची सहा महिन्यांची मुदत उलटून गेली तरीही त्यांनी सिद्धेश्र्वर मनिलेंडर्सला पैसे परत दिले ना-हीत. या रकमेच्या वसुलीसाठी राजकुमार कापसे यांनी सतत तगादा लावला असता तोशीब आलमेलकर यांनी महाराष्ट्र नागरी सहकारी बँकेच्या मार्केट यार्ड शाखेचा २ लाख २० हजार रुपयांचा धनादेश सिद्धेश्वर मनिलेंडर्सच्या नावाने दिला होता. तो धनादेश देय तारखेला इंदिरा महिला नागरी सहकारी बँक, शाखा गांधी मार्केट लातूर येथील खात्यावर लावला. मात्र, सदरचा धनादेश खात्यावर पुरेशी रक्कम उप-लब्ध नसल्याच्या कारणावरून न वटता परत आला. धनादेश परत आल्यानंतरही राजकुमार कापसे यांनी तोशीब आलमेलकर यांच्याकडे पैशाची मागणी केली. त्यावेळी आरोपीने पैसे देण्यास टाळाटाळीचे धोरण अवलंबल्याने अखेर कापसे यांनी याप्रकरणी कलम १३८ नुसार प्रथमवर्ग न्याय दंडाधिकारी-४ न्यायाधीश श्रीनिवास एच. पांचाळ यांच्या न्यायालयात रितसर तक्रार दाखल केली होती. या प्रकरणी सुनावणी होऊन आरोपीने जाणीवपूर्वक फसवणूक केल्याचे निदर्शनास आल्याने त्याला ४ लाख ३० हजार रुपये दंड व सहा महिन्यांची शिक्षा सुनावली. याप्रकरणी फिर्यादी राजकुमार कापसे यांच्या वतीने ॲड. नसीर एच. शेख यांनी काम पाहिले. त्यांना ॲड. अजित टेकाळे, ॲड. वसीम शेख, ॲड. प्रवीण शिंदे यांनी सहकार्य केले.



## ओबीसी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह करा : आ. देशमुख

**लातूर :** राज्याचे माजी मंत्री, आमदार अमित विल-ासराव देशमुख यांनी आज विधानसभेत राज्यातील इतर मागासवर्गीय (ओबीसी) विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी शासकीय वसतिगृह उभारणीचे उद्दिष्ट अपूर्ण राहिल्याबद्दल तारांकित प्रश्न उपस्थित केला. प्रत्येक जिल्ह्यात २०० विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह उभारणीचे उद्दिष्ट असताना ते किती साध्य झाले, असा प्रश्न त्यांनी विचारला.

यावर सामाजिक न्याय व विशेष साहाय्य मंत्री अतुल सावे यांनी, वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या ३६ जिल्ह्यातील २१,६०० पात्र ओबीसी विद्यार्थी-विद्यार्थिनींना त्यांच्या बँक खात्यात थेट निवास व भोजन खर्च भत्ता वाटप करण्यात येत असल्याची माहिती दिली. तसेच, आमदार देशमुख यांच्या मागणीनुसार लवकरच वसतिगृह उभारणीचे आश्र्वासनही त्यांनी दिले. राज्याचे माजी मंत्री, आ. अमित देशमुख यांनी विधानसभेत नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात राज्यातील इतर मागासवर्गीय विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी शासकीय वसतिगृह उभारणीच्या अपूर्ण उद्दिष्टावर तारांकित प्रश्न उपस्थित केला. आ. देशमुख यांनी प्रश्न विचारला की, महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात विद्यार्थी आणि विद्यार्थिनींसाठी शासकीय वसतिगृह उभारणीचे उद्दिष्ट असताना, आत्तापर्यंत हे उद्दिष्ट किती प्रमाणात साध्य झाले आहे? असा प्रश्न उपस्थित केला.

या उद्दिष्ट पूर्तीसाठी जेथे वस्तीगृहांचे बांधकाम

## लातूर येथे सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनास प्रारंभ

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ९ डिसेंबर :** सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनास जिल्ह्यात आजपासून प्रारंभ झाला आहे. देशाच्या

### माजी सैनिक कुटुंबियांना देण्यासाठी प्रयत्न करणार -जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

संरक्षणासाठी लढणाऱ्या, बलिदान करणाऱ्या सैनिकांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी यामाध्यमातून आपल्याला प्राप्त होते. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने सशस्त्र सेना ध्वजदिन निधीमध्ये आपले योगदान द्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले. तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ जिल्ह्यातील सैनिक, माजी सैनिक कुटुंबियांना मिळवून देण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन समिती सभागृहात आयोजित कार्यक्रमात जिल्हाधिकारी तथा जिल्हा सैनिक बोर्डाच्या



अध्यक्ष श्रीमती ठाकूर-घुगे यांच्या हस्ते सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनास सुरुवात करण्यात आली. जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्याम वाखर्डे, जिल्हा सैनिक अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (नि.), ईसीएचएसचे प्रभारी अधिकारी कर्नल प्रकाश राजकर (नि.), ले. कर्नल बी. आर. हरणे (नि.) यांच्यासह वीरपत्नी, वीरमाता, वीरपिता, माजी सैनिक व त्यांचे कुटुंबीय यावेळी उपस्थित होते. प्रारंभी वीरमाता, वीरपिता यांच्या हस्ते दीपप्रज्ज्वलन करण्यात आले. तसेच शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

आपल्या देशाचे संरक्षण करणाऱ्या सैनिकांमुळे आपण सुरक्षित आहोत. या सैनिक, माजी सैनिकांच्या, त्यांच्या कुटुंबियांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांना हातभार लावण्यासाठी प्रत्येक नागरिकाने सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनात आपले योगदान द्यावे, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे म्हणाल्या. सैनिक, माजी सैनिक कुटुंबियांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी अभिसरणासह इतर उपक्रम राबविण्यात येणार आ-हेत. माजी सैनिक कुटुंबातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्यासाठीही विशेष उपक्रम हाती घेण्यात येतील, असे जिल्हाधिकारी म्हणाल्या.

प्रत्येक वर्षी ७ डिसेंबर ते ३० नोव्हेंबर या कालावधीत सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलन करण्यात येते. ७ डिसेंबर २०२४ ते ३० नोव्हेंबर २०२५ या कालावधीत लातूर जिल्ह्याला ४७ लक्ष रुपये निधी संकलनाचे उद्दिष्ट प्राप्त झाले होते. मात्र, जिल्ह्यात १ कोटी १५ लाख ९५ हजार रुपये निधी संकलन करून २४६.७० टक्के उद्दिष्ट पूर्ण करण्यात आले. त्यामुळे निधी संकलनात जिल्ह्याने सलग दुसऱ्या वर्षी राज्यात द्वितीय क्रमांक मिळविला आहे. यंदाही जिल्ह्याला ४७ लाख रुपयांचे उद्दिष्ट आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनामध्ये योगदान द्यावे, असे आ-वाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (नि.) यांनी केले.

यावेळी उपस्थित वीरपत्नी, वीरमाता, वीरपिता यांचा जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच शौर्य पदक प्राप्त सैनिकांच्या वीरपत्नी, माजी सैनिक, विशेष पुरस्कार प्राप्त माजी सैनिक पाल्यांचा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. गतवर्षी सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शासकीय कार्यालय प्रमुखांचाही यावेळी सन्मान करण्यात आला. जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातील वरिष्ठ लिपिक एस. व्ही. घोंगडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## १८ डिसेंबरपर्यंत 'पदवीधर' यादीमध्ये नाव नोंदविता येणार

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ९ डिसेंबर :** भारत निवडणूक आओग व मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या निर्देशानुसार ०५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदार संघासाठी नव्याने मतदान याद्या तयार करण्याचा कार्यक्रम घोषित करण्यात आला आहे. त्यानुसार ६ नोव्हेंबर, २०२५ पर्यंत नमुना १८ प्राप्त झालेले अर्जांची प्रारूप यादी ३ डिसेंबर, २०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. या यादीवर १८ डिसेंबर २०२५ पर्यंत दावे व हरकती स्वीकारण्यात येणार आहेत.

दावे व हरकती दाखल करताना नमुना अर्ज ७ व ८ मध्ये हरकती दाखल करता येतील. तसेच मतदार यादीमध्ये नव्याने नाव समाविष्ट करण्यासाठी १८ डिसेंबर पर्यंत नमुना अर्ज १८ ऑनलाईन किंवा ऑफलाईन पध्दतीने सादर करता येणार आहे. नमुना अर्ज १८ ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यासाठी संबंधित लिंकचा वापर करावा. त्या अनुषंगाने ०५- औरंगाबाद विभाग पदवीधर संघाकरिता नव्याने तयार होणाऱ्या मतदार यादीत नाव समावेश करण्यासाठी ला-तूर तालुक्यातील सर्वसाधारण रहिवास असलेल्या सर्व पदवीधारकांनी नमुना अर्ज ७ व ८ मध्ये हरकती मतदान केंद्रनिहाय नियुक्त पदनिर्देशित अधिकारी यांच्याकडे दाखल करावेत. तसेच मतदार यादीत नव्याने नाव समाविष्ट करण्यासाठी नमुना अर्ज १८ भरून पदनिर्देशित अधिकारी यांच्याकडे दाखल करावेत, असे उपविभागीय अधिकारी श्रीमती रोहिणी नऱ्हे व तहसीलदार सौदागर तांदळे यांनी कळविले आहे.

## महिला सक्षमीकरणासाठी विलासराव देशमुख फाउंडेशनचा 'साई' येथे पुढाकार

**लातूर :** विलासराव देशमुख फाउंडेशनच्या वतीने साई येथे सुरू




करण्यात आलेल्या मोफत शिलाई प्रशिक्षण केंद्राचा यशस्वी समारोप सोहळा नुकताच उत्साहात पार पडला. महिला सक्षमीकरणाच्या या उपक्रमात प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्या ६३ महिलांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

राज्याचे माजी मंत्री आ. अमित देशमुख यांच्या मार्गदर्शनाने आणि ट्वेंटीवन ग्री लि. च्या संचालिका सौ. अदिती अमित देशमुख यांच्या पुढाकारातून हे प्रशिक्षण केंद्र चालवण्यात आले होते. महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहता यावे आणि स्वयंरोजगाराची संधी मिळावी, या उद्देशाने फाउंडेशनने हा उपक्रम सुरू केला आहे. साई येथील या प्रशिक्षण केंद्रात महिलांना ३ महिन्यांचे व्यावसायिक शिलाई प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणात शिलाईच्या विविध पद्धती, डिझाइनिंग आणि कटिंग यांसारख्या विषयांचे सखोल ज्ञान महिलांना देण्यात आले.

### ६३ महिलांना शिलाई प्रशिक्षण प्रमाणपत्र प्रदान

प्रशिक्षक क्रांती उफाडे यांच्या मार्गदर्शनाखाली या ६३ महिलांनी शिलाई कामातील कला आणि कौशल्ये आत्मसात केली.

प्रशिक्षण पूर्ण केलेल्या महिलांचा प्रमाणपत्र वितरण सो-हळा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला विलासराव देशमुख फाउंडेशनच्या समन्वयक संगीता मोळवणे, गावचे उपसरपंच अमोल पवार, प्रशिक्षक क्रांती उफाडे, गजानन बोयणे यांच्यासह प्रशिक्षणार्थी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## १३ डिसेंबरपासून लातूरमार्गे पंढरपूर-तिरुपती साप्ताहिक रेल्वेसेवा सुरु होणार : निलेगांवकर

लातूर : येत्या दि. १३ डिसेंबर २०२५ पासून पंढरपूर- तिरुपती व्हाया लातूर साप्ताहिक रेल्वेसेवा सुरु होणार असल्याची माहिती मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागीय सल्लागार समितीचे सदस्य संजय निलेगांवकर यांनी दिली.

पंढरपूरमार्गे तिरुपती रेल्वे सेवा सुरु करण्यात यावी, अशी मागच्या अनेक वर्षांपासूनची प्रवाशांची मागणी होती. रेल्वे सल्लागार समितीचे सदस्य संजय निलेगांवकर यांनी दि. १० ऑक्टोबर रोजी पार पडलेल्या रेल्वे सल्लागार समितीच्या महत्वपूर्ण बैठकीत ही मागणी आग्रहाने लावून धरली होती.



त्यांनी ही रेल्वेसेवा लातूरमार्गे पंढरपूर-तिरुपती सुरु करण्याच्या दृष्टीने सकारात्मक प्रयत्न केले. त्यांच्या मागणीनु-सार दक्षिण मध्य रेल्वे विभागाने गाडी क्रमांक ०७०१२ व ०७०१३ ही तिरुपती पंढरपूर-तिरुपती साप्ताहिक रेल्वे सेवा लातूरमार्गे सुरु करण्यास नुकतीच मंजुरी दिली आहे. येत्या दि. १३ डिसेंबर २०२५ शनिवार पासून ही गाडी सुरु होणार आहे. गाडी क्रमांक ०७०१२ ही दि. १३ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ४ वाजून ४० मिनिटांनी तिरुपतीहून सुटेल.ही गाडी काचीगुडा, सिकंदराबाद, बिदरमार्गे दुसऱ्या दिवशी म्हणजे दि. १४ डिसेंबर रोजी दुपारी २ वाजून २० मिनिटांनी लातूर स्थानकावर पोहच-ेल. ही गाडी सायंकाळी ६ वाजून ५० मिनिटांनी पंढरपूर स्थानकावर पोहचेल. गाडी क्रमांक ०७०१३ ही दर रविवारी पंढरपूरहून रात्री आठ वाजता निघेल. ही गाडी मध्यरात्री १२ वाजून १० मिनिटांनी लातूर रेल्वे स्थानकावर पोहच-ेल तर दुसऱ्या दिवशी म्हणजे सोमवारी रात्री साडेदहा वाजता तिरुपती स्थानकावर पोहचेल. या गाडीला एक एसी प्रथमवर्ग, एक एसी फर्स्ट कम टू टिअर , दोन एसी टू टिअर , ६ एसी थ्री टिअर , ९ स्लीपर क्लास, दोन द्वितीय श्रेणी कम दिव्यांग एसएलआर असे एकूण २३ डबे असणार आहेत.

ही सुविधा तूर्तास दि. १३ डिसेंबर ते दि. २८ डिसेंबर २०२५ या कालावधीत सुरु असणार आहे. प्रवाशांच्या मिळणाऱ्या प्रतिसादावर या गाडीची पुढील रूपरेषा निश्चित केली जाणार असल्याचे संजय निलेगावकर यांनी सांगितले.

याशिवाय या बैठकीत हरंगुळ रेल्वे स्थानकाची प्लॅटफॉर्मची उंची आणि लांबी वाढविणे, लातूर-पुणे-खडकी इंटरसिटी रेल्वे सेवा सुरु करणे आदी विषयांवरही महत्वपूर्ण चर्च झाल्याची माहिती निलेगांवकर यांनी दिली.

## अग्रलेख...

# 'इंडिगो'पेक्षा 'इंडिया' महत्त्वाचा

भारताची विविध क्षेत्रांतील गगन भरारी सारे जग विस्मयचकित होऊन पाहत असताना गेल्या आठवड्यात एक आक्रित घडले. इंडिगो नावाच्या विमान सेवेने सरकारी निर्देशांचे पालन करण्याच्या नावावर भारताची नागरी उड्डाण क्षेत्रातील भरारी एका झटक्यात जमिनीवर आणली. नागरी उड्डाण महासंचालनालयाचे निर्देश काय आहेत, त्यांचे पालन करण्यासाठी काय लागेल हे सारे इंडिगोला आधीपासून माहिती होते. तरीही त्यांनी त्या निर्देशांचे पालन थेट सक्ती झाल्यावर सुरू केले आणि त्यातून हे संकट उद्भवले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारताचे प्रभावक्षेत्र विस्तारत असताना इंडिगोने साऱ्या जगात भारताची नाचक्की केली. विविध क्षेत्रांत विकास होत असताना त्याचा परिणाम म्हणून राष्ट्रांतर्गत व आंतरराष्ट्रीय विमान सेवेचे क्षेत्र विस्तारत असते. तेच भारतात घडले. दीड-दोन दशकात एअर इंडियाला एकीकडे घरघर लागली आणि खाजगी विमान कंपन्या या क्षेत्रात उतरल्या. त्याचा फायदाही झाला. स्पर्धेमुळे सेवेचा दर्जा सुधारला आणि विमान वाहतुकीचे दर मर्यादित राहिले. खरे तर ही स्पर्धा कायम टिकवायला हवी होती. तसे झाले नाही. अनेक खाजगी कंपन्यांची विमान सेवा सुरू झाली तशी कालांतराने बंद पडली. एअर इंडियाचा तर जवळजवळ बॅण्डबाजा वाजला. मैदानात प्रामुख्याने उरली इंडिगो आणि दोन-चार किरकोळ कंपन्या. इंडिगोचा मार्केट शेअर ६० टक्क्यांच्या वर आहे. दीड हजारापैकी तब्बल सहाशे सेक्टर्समध्ये इंडिगोचा एकाधिकार आहे. एका अर्थाने भारतात इंडिगोची मक्तेदारी प्रस्थापित झाली. प्रवाशांना फारसे पर्याय उरले नाहीत. त्यामुळे अव्वाच्या सव्वा तिकिटाचे दर, खाद्यपदार्थांची विमानात विक्री, पायलट आणि अन्य कर्मचाऱ्यांकडून अल्प वेतनात अधिकाधिक काम करून घेणे, ग्राऊंड क्रूची वेठबिगारी, अधिकाधिक काळ विमाने हवेत ठेवणे, जेणेकरून अधिकाधिक सेक्टर्सपर्यंत पोहोचता येईल असे धोरण इत्यादी अनेक गोष्टी इंडिगोच्या व्यवस्थापनाने केल्या. त्यातून कंपनीचा नफा वाढला तर शेअर्सही वधारले. पण, अशा प्रकारचा एकाधिकार देशासाठी घातक असतो, याची दखल वेळेत घेतली गेली नाही. त्यामुळेच एका इंडिगोची सेवा ठप्प झाली तर साऱ्या देशाची सेवा बंद पडल्याचे आपण पाहिले. विकेंद्रित झालेल्या क्षेत्रात खरे तर असे घडता कामा नये. टेलिकॉम, बँकिंग, एफएमसीजी इत्यादी क्षेत्रातील विकेंद्रीकरणाचा भारतीयांना फायदा झाला. हवाई वाहतुकीच्या क्षेत्रात मात्र इंडिगोच्या एकाधिकाराचा घातक परिणाम आता दिसला. गेल्या आठवड्यांत भारतातील लाखो प्रवाशांनी जो त्रास अनुभवला, तो शब्दातीत आहे. इंडिगोने साधारण दोनेक दशकांपूर्वी देशांतर्गत विमान सेवा सुरू केली तेव्हा कमी दरात सेवा देण्याचे आमिष दाखविले गेले. बरीच वर्षे ते पाळलेही गेले. पण, मक्तेदारी सुरू झाल्याचा अंदाज आल्याबरोबर इंडिगोने आपले खरे रंग दाखविण्यास सुरुवात केली. भारतात विमान प्रवास हा एकेकाळी चैनीचा विषय होता. खाजगी विमान सेवा सुरू झाल्यामुळे मध्यमवर्गीयांनाही उड्डाणे परवडू लागली. वेळेचे उत्तम नियोजन, किफायतशीर दर आणि इतरांच्या तुलनेत चांगली सेवा यामुळे इंडिगोने एव्हिएशनच्या बाजारपेठेत पैठ निर्माण केली. गेली अनेक वर्षे इंडिगोचा एकाधिकार आहे आणि त्याच्या तालावर भारताचे नागरी वाहतूक क्षेत्र नाचते आहे हे दुर्दैव. वैमानिकांच्या कामांचे तास आणि उड्डाणे व लॅण्डिगच्या संख्येवरील मर्यादा हे काही नवे नव्हते. इंडिगोला सारे काही ठावूक होते. तरीही कंपनीने बुकिंग वाढवले, विमान वेळापत्रक आखले आणि नंतर प्रत्यक्षात त्या बुकिंगच्या हाताळणीसाठी इतकी उड्डाणे करण्याइतकी क्षमताच इंडिगोकडे नसल्याचे उघड झाले. परिणामी हजारो उड्डाणे रद्द झाली, लाखो प्रवासी अडकले, विमानाच्या तिकिटांचे दर आकाशाला भिडले, तरीही काही लोकांना ती तिकिटे घेऊन प्रवास करावा लागला, ज्यांना ते जमले नाही त्यांचे नुकसान झाले. ही घटना अचानक घडलेली नाही. कमी संसाधनांवर अधिकाधिक बिझनेस करू पाहणाऱ्या व एकाधिकाराच्या मस्तीत असलेल्या कॉर्पोरेट मॉडेलमुळे जे काही घडण्याची शक्यता असते, तेच यावेळी घडले आहे. भारतीय अर्थव्यवस्थेच्या गगन भरारीला लागलेली ही दृष्ट आहे, प्रवाशांच्या हक्कांचा भंग आहे आणि लोकांच्या विश्वासाशी केलेली प्रतारणाही!

इंडिगोच्या या धिंगाण्याच्या पृष्ठभूमीवर नॅशनल कॅरिअर किंवा फ्लॅग कॅरिअर या संकल्पनेकडे पाहिले पाहिजे. एअर इंडियाची सुरुवातीपासूनची ओळख ही भारताची राष्ट्रीय विमान सेवा अशी. बऱ्याच प्रगत देशांत अशी पद्धत आहे की, सरकारचे पाठबळ असलेली एक राष्ट्रीय विमान सेवा असतेच. ती त्या देशाची भावनिक नव्हे तर धोरणात्मक गरज असते. केंद्रात काँग्रेसप्रणीत सरकार असताना एअर इंडियाला घरघर लागली. त्याचे पुढे काय झाले हे सर्वांना ठावूक आहे. टप्प्याटप्प्याने भारतात नॅशनल कॅरिअर ही संकल्पनाच संपुष्टात आली आणि खाजगी कंपन्यांचे फावले. त्याचा सर्वाधिक लाभ इंडिगोने घेतला. एअर इंडिया पूर्वीसारखी सक्षम सेवा देऊ शकली असती तर आता हे असे संकट उद्भवले नसते. किमान त्याची तीव्रता तरी कमी झाली असती. या संकटाने हे दाखवून दिले आहे की, भारताला तातडीने नॅशनल कॅरिअरची गरज आहे. लो कॉस्ट एव्हिएशनचे मॉडेल यशस्वी होते, हे भारतात सिद्ध झाले आहे. पण, कमी पगारातले कर्मचारी, सुरक्षेवर अत्यल्प खर्च, पायाभूत सुविधांवरील खर्चात कंची मारणे हे देशाच्या दृष्टीने घातक असते. लो कॉस्ट मॉडेलचे यश सिद्ध करणाऱ्या इंडिगोने ही दुसरी बाजूही सिद्ध केली आहे, हे आपण समजून घेतले पाहिजे. भारताच्या नागरी विमान वाहतूक क्षेत्रावर एकाच कंपनीचे वर्चस्व इतके मोठे झाले आहे की, ती अडखळली, तर संपूर्ण उद्योग व सारा देश खोळंबला. यातून साऱ्यांनी, विशेषतः सरकारने धडा घेतला पाहिजे. खरे तर भारतासारख्या खंडप्राय देशात दहा-बाराच एअरलाईन्स असणे भूषणावह नाही. युरोपातल्या, महाराष्ट्राहून छोट्या असलेल्या अनेक देशांत चाळीस-पन्नास एअरलाईन्स आहेत. अमेरिकेत पन्नासावर आहेत. भारतात किमान शंभर एअरलाईन्सना वाव आहे.

इंडिगोला इशारे देणे आणि तिकिटांचे दर निर्धारित करून देणे पुरेसे नाही. आता सरकारतर्फे तिकिटांचे जे दर ठरवून दिले गेले आहेत, त्यात सुद्धा नफेखोरीच होणार हे लिहून ठेवा. कारण ती एमआरपी आहे आणि कर वेगळे असणार आहेत. सरकारने हस्तक्षेप केला नाही तर विमान प्रवासाचे दर दीडपटीहून जास्त होतील, अशा विचित्र पद्धतीने हे निर्धारण केले गेले आहे, हे येथे स्पष्टपणे सांगितले पाहिजे. आता व्हायला हवे ते असे की, भारतातील नागरी विमान वाहतूक क्षेत्रात अधिकाधिक कंपन्या कशा येतील आणि इंडिगोचा एकाधिकार कसा संपेल यासाठी सरकारनेच प्रयत्न केले पाहिजेत. लवकरात लवकर सरकारचे पाठबळ असलेले नॅशनल कॅरिअर सुरू केले पाहिजे. सार्वजनिक सेवा आणि राष्ट्रीय संपत्ती व इभ्रत या दोन्ही दृष्टींनी आवश्यक आहे. लहान, मध्यम विमान सेवा कंपन्यांना इंधन कर, लीजिंग शुल्क, परवाने सुलभ करणे, प्रादेशिक मार्गांवर प्रोत्साहन देणे हे सारे केले पाहिजे. विमान सेवा संचालनाचे नियमन कडक व काटेकोर केले पाहिजे. प्रवाशांना नुकसानभरपाई देण्याचे नियम सुद्धा अत्यंत कठोर असले पाहिजेत. भारताची अर्थव्यवस्था, स्थलांतर, पर्यटन, व्यापार, सेवा क्षेत्र आणि सामाजिक मोबिलिटी या सर्वांचा महत्त्वाचा आधार म्हणजे विमान सेवा होय. तिथे कॉर्पोरेटच्या नफेखोरीला प्राधान्य आणि देशहित त्यानंतर असे धोरण घातक आहे. भारताला इंडिगो अजिबात नको असे नव्हे. इंडिगोने चांगली सेवा दिली म्हणून ती कंपनी वाढली हे खरे आहे. तिचा एकाधिकार निर्माण व्हायला नको होता एवढेच. आता इंडिगोसह अन्य तेवढ्याच ताकदीच्या अनेक विमान सेवा कंपन्या मैदानात आल्या तर सुरक्षित, दर्जेदार व खात्रीशीर अशी सेवा सुनिश्चित होऊ शकेल. ती देशाची, देशाच्या अर्थव्यवस्थेची, अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय व्यवहाराची आणि भारताच्या जागतिक प्रतिमेची गरज आहे. काहीही झाले तरी हे केलेच पाहिजे. कारण 'इंडिगो'पेक्षा 'इंडिया' महत्त्वाचा आहे. भारत, भारताचे लोक, भारताचा आत्मविश्वास आणि भारताची प्रतिमा सर्वांत महत्त्वाची आहे.

## आंतरराष्ट्रीय

# भारत-तुर्कस्तानचा परस्परांना शह-काटशह

प्रा. जयसिंग यादव

पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानवर हल्ला केला. 'ऑपरेशन सिंदूर'अंतर्गत पाकिस्तानमधील शंभरहून अधिक दहशतवाद्यांना यमसदनी धाडले. पाकिस्तानमधील दहशतवाद्यांची ठिकाणे उद्ध्वस्त केली. जगभरातून पाकिस्तानच्या दहशतवादी हल्ल्याचा निषेध करण्यात आला. फक्त तुर्कस्तानसह काही मूठभर पाकिस्तानधार्जिण्या देशांचा काय तो अपवाद. 'ऑपरेशन सिंदूर'च्या वेळी तुर्कस्तानने पाकिस्तानला ड्रोन पुरवले. तेव्हापासून भारत आणि तुर्कीमधील संबंधांमध्ये दुरावा निर्माण झाला. पाकिस्तानने या संघर्षादरम्यान भारतीय लष्करी तळ आणि नागरी क्षेत्रांना लक्ष्य करण्यासाठी तुर्कीने पुरवलेल्या ड्रोनचा वापर केला. या ड्रोनमध्ये असीसगार्ड आणि सोंगरसारख्या मॉडेल्सचा समावेश होता. नंतर भारताने या मुद्यावर तुर्कीकडे चिंता व्यक्त केली. तुर्की गेल्या अनेक वर्षांपासून पाकिस्तानला एफ-१६ फायटिंग फाल्कन जेट आणि बायरक्तर ड्रोन पुरवत आहे. तुर्की हा केवळ पाकिस्तानचा दुसरा सर्वांत मोठा शस्त्रास्त्र पुरवठादार देश नाही, तर त्याच्या जवळच्या मित्रांपैकी एक आहे. भारतासाठी दीर्घकाळापासून चिंता असलेल्या काश्मीर मुद्यावर पाकिस्तानला त्याने सातत्याने पाठिंबा दिला आहे. लष्करी उपकरणे पुरवण्याव्यतिरिक्त तुर्कीचे अध्यक्ष रेसेप तय्यिप एर्दोगान यांनी मे महिन्यातील संघर्षादरम्यान पाकिस्तानला समर्थन दिले. या तणावातच भारत २९ ऑक्टोबर रोजी दिल्ली येथे आयोजित तुर्कीच्या राष्ट्रीय दिन समारंभापासून दूर राहिला. त्यानंतर लगेचच मीडिया रिपोर्टसनुसार, नोव्हेंबरमध्ये, तुर्कीने अमेरिकेची अपाचे हेलिकॉप्टर भारताला मिळण्यातही अडथळा आणला. त्यांना त्यांच्या हवाई हद्दीतून उड्डाण करण्याची परवानगी नाकारली.

भारताच्या शेजाऱ्यांसोबत तुर्कीच्या वाढत्या संरक्षण कारवाया हिंदी महासागर प्रदेशावरील वाढत्या लक्षाचे प्रतिबिंब आहेत. भारताच्या जवळच्या मानल्या जाणाऱ्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांना बांगलादेशमध्ये सत्तेवरून घालवल्यानंतर तुर्कीने मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखालील अंतरिम सरकारशी लष्करी संबंध अधिक मजबूत केले आहेत. ३ नोव्हेंबर रोजी तुर्कीच्या संसदीय शिष्टमंडळाला भेटल्यानंतर, युनूस म्हणाले की, बांगलादेश आपल्या लोकांसाठी नवीन संधी उघडण्यासाठी तुर्कीसोबत काम करण्यास तयार आहे. बांगलादेश तुर्कीकडून अनेक लष्करी उपकरणे खरेदी करण्यासाठी चर्चा करत आहे. त्यात बायरक्तार टीबी-२ ड्रोन, टीआरजी-३०० रॉकेट सिस्टिम आणि ओटोकर तलपर लाईट टँक यांचा समावेश आहे. लष्करी बातम्या देणाऱ्या बांगलादेशी वेबसाईटनुसार, बांगलादेश तुर्कीकडून 'शिपर' लांब पल्ल्याच्या हवाई संरक्षण प्रणाली खरेदी करण्याचा विचार करत आहे. काही भारतीय माध्यमांच्या वृत्तांनुसार, वाटाघाटी आधीच



सुरू आहेत. बांगलादेश पारंपरिकपणे शस्त्रास्त्रांसाठी चीनवर अवलंबून राहिला असला, तरी तो आता तुर्कीकडून शस्त्रे खरेदी करत आहे. बांगलादेश २०२२ मध्ये तुर्कीचा सर्वोच्च शस्त्रास्त्र खरेदीदार बनला.

बांगलादेशसोबतच्या वाढत्या मैत्री संबंधामुळे तुर्कीला बंगालच्या उपसागरात एक धोरणात्मक उपस्थिती मिळाली आहे. नोव्हेंबर २०२३ मध्ये मालदीवचे राष्ट्रपती मोहम्मद मुईझ्झू यांनी पदभार स्वीकारल्यानंतर इस्तंबूलला पहिली भेट दिली. त्यानंतर मालदीव या आणखी एका हिंदी महासागरीय राष्ट्राशी तुर्कीने सहकार्य वाढले. या वर्षी मार्चमध्ये तुर्कीने मालदीवला स्वदेशी विकसित सशस्त्र ड्रोन दिले. त्यानंतर एप्रिलमध्ये तुर्कीने एक जुने नौदल जहाजदेखील भेट दिले. यापूर्वी, जानेवारी २०२४ मध्ये मालदीवने त्यांच्या विशेष आर्थिक क्षेत्राचे निरीक्षण करण्याची घोषणा केली. तुर्कीकडून लष्करी ड्रोन खरेदी करण्यासाठी ३७ दशलक्ष डॉलरचा करार करण्यात आला. २२ ते २७ जुलैदरम्यान इस्तंबूल येथे झालेल्या संरक्षण मेळाव्यात तुर्कीने भारताच्या आणखी एका शेजारी देशाशी, श्रीलंकेशी सहकार्य करार केला. जूनच्या सुरुवातीला तुर्की नौदल युद्धनौका कोलंबोमध्ये बंदिस्त होती. श्रीलंकेने तिचे वर्णन 'वाढत्या संरक्षण सहकार्याचे प्रतीक' असे केले होते. गेल्या आठवड्यात जोहान्सबर्ग येथे झालेल्या जी-२० शिखर परिषदेदरम्यान पंतप्रधान मोदी यांनी अंगोलाचे अध्यक्ष जोआओ लोरेन्को यांच्याशी हस्तांदोलन केले आणि एर्दोगान यांनी जर्मन चान्सलर फ्रेडरिक मर्झ यांच्याशी हस्तांदोलन केले; परंतु मोदी आणि एर्दोगान यांच्यात एकाच व्यासपीठावर असूनही राजशिष्टाचार म्हणूनही हस्तांदोलन झाले नाही.

भारतीय माध्यमांच्या एका गटाचे म्हणणे आहे की, लष्करी सहकार्य मजबूत करण्याव्यतिरिक्त तुर्की भारताच्या शेजारी आपली गैर-लष्करी उपस्थिती आणि प्रभाव वाढवण्याचा प्रयत्न करत आहे. तुर्कीच्या परराष्ट्र मंत्रालयाने ऑगस्ट २०१९ मध्ये आशियाई देशांसोबत सहकार्य वाढवण्याच्या उद्देशाने 'आशिया : एक नवीन उपक्रम'ची घोषणा केली. तुर्कीच्या सरकारसमर्थक येनी सफाक वृत्तपत्रात २९ मे रोजी प्रकाशित झालेल्या एका वृत्तात असेही म्हटले आहे की, दक्षिण आशियातील तुर्कीचा वाढता प्रभाव भारतासाठी चिंतेचा विषय बनला आहे. 'फर्स्ट पोस्ट' या भारतीय वेबसाईटवर प्रकाशित झालेल्या एका भाष्यात म्हटले आहे की. एर्दोगान इस्लामिक जगाचा नेता बनण्याचा प्रयत्न करत आहेत. पाकिस्तान हा तुर्कीचा कनिष्ठ भागीदार असून यातील वैचारिक स्पर्धेत सहभागी आहे. तुर्की बांगलादेशमध्ये अनेक उच्चस्तरीय संवादांमध्ये सक्रिय आहे. भारतीय गुप्तचर सूत्रांचा हवाला देत सीएनएन-न्यूज१८ च्या एका अहवालात दावा करण्यात आला आहे, की तुर्की गुप्तचर संस्था बांगलादेशमधील इस्लामी गटांना, विशेषत: कट्टरपंथी 'जमात-ए-इस्लामी'ला आर्थिक आणि लॉजिस्टिक साहाय्य करत आहे. नेपाळमध्ये तुर्की सरकारच्या निधीतून चालणाऱ्या 'आयएचएच' या स्वयंसेवी संस्थेने कार्याचा विस्तार केला आहे. ते अल्पसंख्यक मुस्लिम लोकसंख्येसाठी मशिदी, मदरसे आणि इस्लामिक केंद्रांच्या बांधकामासाठी निधी देत आहे. तुर्कीची कार्यपद्धती दुहेरी असल्याचे दिसून येते. भारतीय मुख्य प्रवाहातील माध्यमांनी सूचित केले आहे की भारत सरकार तुर्कीचे प्रतिस्पर्धी ग्रीस, सायप्रस आणि आर्मेनिया यांच्याशी भागीदारी करण्यावर पुन्हा भर देत आहे. दक्षिण आशियाच्या सुरक्षा क्षेत्रात तुर्कीचा अनपेक्षित प्रवेश भारताला असणाऱ्या धोक्याच्या गणितात बदल घडवत आहे. तुर्की आता दूरचा निरीक्षक राहिलेला नाही. तो सक्रिय अडथळा निर्माण करणारा देश बनला आहे. 'आयएनएस त्रिकंद'ने १७-१८ सप्टेंबर रोजी ग्रीक नौदलाच्या जहाजांसह नौदल सराव केला. २४ सप्टेंबर रोजी सायप्रस नौदलासोबत असाच एक सराव झाला. हे संयुक्त सराव तुर्कीसाठी अडचणी निर्माण करू शकतात. शेजारी ग्रीसशी तुर्कीचे दीर्घकाळापासूनचे वैर आहे. तुर्कीच्या प्रतिस्पर्ध्यांसोबत नौदलाच्या सहभागाचा संदर्भ देत भारत पूर्व भूमध्यसागरीय आणि दक्षिण काकेशसमध्ये निर्णायकपणे आपली उपस्थिती दर्शवत आहे, तो तुर्कीच्या प्रादेशिक प्रभावाला धोरणात्मक प्रतिसाद देण्याचे संकेत देतो, असे एका वृत्तात म्हटले आहे.

तुर्की आणि भारताचे व्यापारी संबंध मध्यम स्वरूपाचे आहेत; परंतु अलिकडेच तुर्कीविरुद्धच्या निदर्शनांमुळे आणि प्रवास निर्बंधांमुळे यावर परिणाम झाला आहे. भारतातील तुर्की गुंतवणुकीचाही आढावा घेतला जात आहे. राष्ट्रीय हितसंबंधांवर परिणाम झाल्यास तुर्की कंपन्यांना प्रकल्पांमधून काढून टाकले जाऊ शकते. सायप्रसच्या उत्तरेकडील भागावरील नियंत्रणावरून तुर्कीशी संघर्ष करणाऱ्या सायप्रसच्या सार्वभौमत्वाला आणि एकतेला भारत पाठिंबा देतो. त्यामुळे दोन देशांच्या व्यूहरचना परस्परांना शह-काटशह देणाऱ्या आहेत, हे स्पष्ट होते.

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

चंद्रकांत लोहाणा

# हिवाळी अधिवेशन आणि अपेक्षा

सध्या नागपूर येथे विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन सुरू आहे. या अधिवेशनाकडून वैदर्भीयांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. काहीतरी ठोस आपल्या हाती लागेल असा विश्वास आहे. काही अपवादाची वर्षे वगळता महाराष्ट्रात काँग्रेसचीच सत्ता होती. काँग्रेसने विदर्भाचे पार वाटोळे करून ठेवले. काँग्रेसच्या आजवरच्या नीतीने विदर्भ बकाल झाला. त्यामुळे सर्वच क्षेत्रामध्ये असलेल्या अनुशेषाने विदर्भ अजूनही होरपळतोय. पश्चिम महाराष्ट्राच्या चलाख नेत्यांनी विदर्भाची कायम उपेक्षा केली. विदर्भाच्या वाट्याचा निधी पळविला. आमचे नेते मात्र आपापली दुकानदारी थाटण्यातच धन्यता मानू लागले. जवळपास पन्नास वर्षांमध्ये विदर्भ आहे, तेथेच आहे. विदर्भामध्येही लोक राहतात. त्यांच्याही आकांक्षा आणि अपेक्षा आहेत, हे पूर्वीच्या सत्ताधीशांच्या लेखीही नव्हते. निवडून दिलेले लोकप्रतिनिधीही बघ्याची भूमिका घेऊन गप्प असायचे. आज बेंबीच्या देठापासून ओरडणारे शरद पवार केंद्रामध्ये अनेक वर्षे कृषी मंत्री होते. त्यावेळी त्यांना विदर्भातील शेतकऱ्यांचा कळवळा कधीच आला नाही. उपाशी मरणाऱ्या आपल्याच राज्यातील शेतकऱ्यांसाठी काहीतरी करावे असे शरद पवारांना त्यावेळी का वाटले नाही? सत्तेसाठी त्यांनी फक्त येथील प्रश्नांचे भांडवल केले आणि जनता होरपळत राहिली.

विदर्भ जेव्हा महाराष्ट्र राज्यात सामील झाला त्यावेळी येथील रोजगाराचे प्रमाण राज्यामध्ये सर्वाधिक होते. त्यावेळी कापसाच्या रूपामध्ये पांढरं सोनं पिकविणारा विदर्भ आघाडीवर होता. परंतु, कायम दुर्लक्षित विदर्भ प्रदेशाला राजकीय अनास्थेचे ग्रहण लागले. त्यानंतर ही ग्रहदशा अधिकच गडद होत गेली. विणकर आणि यंत्रमाग अडगळीत पडले. सिंचन, रस्ते, आरोग्य आणि नोकरीमधील अनुशेष सतत वाढत गेला. त्यानंतर भाजपा सरकारने विदर्भासाठी भरघोस निधी देऊन प्रथमच आपले लक्ष विदर्भावर केंद्रित केले. सुदैवाने यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री विदर्भाचे सुपुत्र आहेत. देवेंद्र फडणवीस यांना विदर्भाच्या ज्वलंत प्रश्नांची जाण आहे. मुख्यमंत्री विदर्भाचे असल्याने जनतेमध्येही उत्साह आहे. विदर्भाचा सर्वांगीण विकास व्हावा, जनतेचे प्रश्न पटलावर मांडून त्यांना न्याय मिळावा या उद्देशाने हिवाळी अधिवेशन नागपूरला घेण्याची परंपरा रूढ झाली. काँग्रेसच्या कार्यकाळामध्ये हा उद्देश कधीच सफल झाला नाही. हुर्डा पार्ट्या अन् सहलीचेच स्वरूप काँग्रेसने नागपूर अधिवेशनाला दिले. त्यामुळे नागपूर अधिवेशन एक फार्स ठरला. विदर्भामधील वाशीम हा आकांक्षित आणि मागासलेला जिल्हा. या जिल्ह्याच्या निर्मितीला २५ वर्षे झालीत. अडीच दशकानंतरही या जिल्ह्याच्या व्यथा आजही कायम आहेत. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून लोकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. या जिल्ह्याचा अनुशेष चुटकीसरशी भरून काढता येईल, असेही नाही. परंतु, त्याची सुरुवात जर या अधिवेशनापासून झाली तर तो एक मैलाचा दगड ठरेल. या जिल्ह्यामध्ये एकही मोठा उद्योग नाही, एकही कारखाना नाही. एमआयडीसी अजूनही भकास आहे. तरुणांच्या हाताला काम नसल्याने रोजगारांसाठी त्यांची भटकंती आजही कायम आहे. विदर्भामध्ये वाशीम जिल्हा सोयाबीनचा हब म्हणून ओळखला जातो. त्यामुळे येथे एखादा सोयाबीनवर प्रक्रिया करणारा प्रकल्प जर उभारला गेला तर अनेक बेरोजगारांच्या हाताला काम मिळू शकते. नरखेड-वाशीम हा रेल्वेमार्ग बडनेऱ्यापर्यंत पूर्ण झाला असून, गेल्या कित्येक वर्षांपासून बडनेरा-वाशीम हा १३० किमीचा रेल्वेमार्ग थंड्या बस्त्यामध्ये पडला आहे. बडनेरा-वाशीम रेल्वे मार्ग जोडला गेल्यास दक्षिण भारत आणि उत्तर भारताला जोडणारा महत्त्वाचा रेल्वेमार्ग ठरू शकतो. त्यासाठी राज्य शासनाने निधीचा वाटा उचलणे गरजेचे आहे. या जिल्ह्याच्या सिंचनासाठी देवेंद्र फडणवीस यांनी नदीजोड प्रकल्पामध्ये वाशीम जिल्ह्याचा समावेश केला आहे. शेतकऱ्यांसाठी ही एक सुखद वार्ता आहे. या प्रकल्पामुळे बऱ्याच अंशी सिंचनाचा अनुशेष भरून निघण्याची शक्यता नाकारता येत नाही. आपल्या पदरामध्ये पाडून घेण्यासाठी लोकप्रतिनिधी आणि जनतेचा रेटा हवा. येथील मातीच्या कणाकणामध्ये संघर्षाचा इतिहास आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विदर्भाच्या अनेक समस्यांच्या मुळाशी हात घालून त्या सोडवल्या आहेत. त्यामुळे या जिल्ह्यातील जनताही आशावादी आहे.

९८८१७१७८५६

## इतस्ततः

# आता खाणींतून पाणी...

दत्तात्रेय आंबुलकर

परंपरागत व्यवहारांपासून पर्यावरणशास्त्रापर्यंत सर्वत्र पाण्याला एक महत्त्वाचा स्रोत मानले जाते. पाण्याचा त्या दृष्टीने उपयोग व त्याचे महत्त्व समजून घेतानाच, या क्षेत्रातील जाणकार व विषयतज्ज्ञांनी देशांतर्गत लहान-मोठ्या आकाराच्या व मोठ्या संख्येत असणाऱ्या खाणींमध्ये उपलब्ध पाण्याचा उपयोग प्रसंगी पिण्याचे पाणी म्हणूनसुद्धा होऊ शकतो, असा अभ्यासपूर्ण पुढाकार घेतला असून, त्या दृष्टीने प्रयत्नांना सुरुवातदेखील झाली आहे. या संदर्भातील प्रमुख उल्लेखनीय मुद्दा म्हणजे रांची येथील सुप्रसिद्ध सेंट्रल माईन प्लॅनिंग ॲण्ड डिझाईन इन्स्टिट्यूट म्हणजेच सीएमपीडीआय या संस्थेतील कोळसा खाणींसह देशातील सर्व खाणींचा अभ्यास करून असे स्पष्ट करण्यात आले आहे की, सद्यस्थितीत सरासरी स्वरूपात देशातील ४३७ कोळसा खाणींमध्ये सुमारे दोन हजार ७०० किलोलिटर्स पाणी उपलब्ध असते व या पाण्याचा उपयोग देशातील विविध कामांसाठी होऊ शकतो.

सीएमपीडीआयच्या याच अभ्यासात नमूद केलेल्या आकडेवारीनुसार, आपल्या कोळसा खाणींमध्ये दरवर्षी साठवण स्वरूपात जे पाणी शिल्लक उरते, त्या पाणीसाठ्याद्वारा ऑलिम्पिकच्या ११ हजार पोहण्याच्या टाक्यांसाठी आवश्यक पाण्याची गरज भागवली जाऊ शकते. आपल्या याच खाण-पाण्याच्या अभ्यासाच्या पाठपुराव्याद्वारे सीएमपीडीआयने प्रायोगिक स्तरावर झारखंड या कोळसाबहुल राज्यातील खाणींमधील पाणीसाठ्यांचा त्यातील पाण्याच्या दृष्टीने अभ्यास केला. या पाण्याचा उपयोग विविध कामांसाठी उत्पादक व उपयुक्त पद्धतीने होऊ शकतो, असे आढळून आल्याने प्रयोगाच्या पुढील टप्प्यात आणखी १४ खाणींमधील पाणसाठ्यांचा उपयोग केला गेला, हे या संदर्भात उल्लेखनीय आहे. खाणींमधील पाण्याच्या उपयोगाचा पहिला यशस्वी टप्पा गाठला गेला २०२१ मध्ये. या पाणी प्रयोगाचे पहिले लाभार्थी ठरले, ते झारखंडच्या रामगड जिल्ह्याच्या पांडी पंचायतीतील रहिवासी. त्यांना कोल इंडियाअंतर्गत 'आरा-८' खाणीतील उपलब्ध पाण्याचा उपयोग गावकऱ्यांच्या विविध उपयोगांसाठी होऊ शकला. याच पाणी उपक्रमाचा अवलंब नंतर 'आरा' खाणीच्या विविध ठिकाणी यशस्वीपणे केला गेला.

पाण्यासाठीच्या या प्रयत्नांची एकूण पृष्ठभूमी म्हणजे कोळसा खाणक्षेत्रात पावसाळ्यादरम्यान साचलेले पावसाचे पाणी व त्यानंतर पण वेगवेगळ्या जलस्रोतांद्वारे झिरपून खाणक्षेत्रांमधील पाणवठ्यांमध्ये साचणारे पाणी



याची साठवण वर्षानुवर्षे व परंपरागत स्वरूपात होत होती. पण, या अशाप्रकारे नैसर्गिक स्वरूपात साचलेल्या पाण्याचा उपयोग कशाप्रकारे करता येईल, यावर फारसा विचार झाला नव्हता. मात्र, गेल्या काही वर्षांत केंद्र सरकारच्या कोळसा मंत्रालयातर्फे कोळसा खाणींमधील पाणीसाठ्यांचा उपयोग केला जाऊ शकतो का, यावर विचार सुरू झाला. सुरुवातीचे प्रयत्न फलदायी ठरले नाहीत. मात्र, या प्रयत्नांमध्ये सातत्य असल्याने त्याची उपयुक्तता सर्वांना समजली. तशातच कोळसा खाणक्षेत्र व परिसरातील ग्रामीण व रहिवाशांसाठी पावसाळ्यानंतर सुमारे सहा महिने पाण्याचे दुर्भिक्ष कायमचे असायचेच. यातूनच खाण परिसरातच राहणारे कोल इंडियाचे अधिकारी व तज्ज्ञ यांनी खाणींमधील पाण्याचा उपयोग लोकांच्या वापरासह पिण्याचे पाणी म्हणून करता यावा, यासाठी आपले प्रयत्न सुरू ठेवले. याच प्रयत्नांची परिणती म्हणजे, गेल्या सुमारे पाच वर्षांपासून या पाण्याचा वापर करता येऊ लागला. केंद्रीय कोळसा खाणमंत्री जी. किशन रेड्डी यांनी नव्यानेच जाहीर केलेल्या निर्णयानुसार, सद्य:स्थितीत कोल इंडिया व त्याअंतर्गत असणाऱ्या विविध कोळसा खाणींमधील अशाप्रकारे उपलब्ध असणाऱ्या पाण्याचा वापर खाण व परिसरातील रहिवासी नागरिकांसाठी करण्यावर केंद्रीय स्तरावर प्राधान्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत.

या संदर्भात केंद्र सरकारच्या विशेष प्रयत्नांतून मर्यादित स्वरूपात अथवा दीर्घकालीनसंदर्भात खाणकाम-खोदकाम वा वापरासाठी नसणाऱ्या खाणींमध्ये साचलेल्या व उपलब्ध असणाऱ्या पाण्याच्या वापरावर विचार करून, त्याचा उपयोग करण्यासाठी विशेष भर दिला गेला. यातूनच खाणीतील जलवापराच्या प्रयत्नांना प्रयत्नपूर्वक यश येत गेले, हे या संदर्भात उल्लेखनीय आहे. याचेच पाणीदार परिणाम आता दिसून येत आहेत. कोळसा खाणींमध्ये तर मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होत असतात. पिढ्यान्पिढ्या या रोजगारसंधींचा लाभ मिळाला आहे. मात्र, आता या खाणींमध्ये उपलब्ध असणाऱ्या या पाण्याचा उपयोग खाण परिसरातील गरजू ग्रामीणांसाठी होणार आहे, हे महत्त्वाचे. या पाण्यापैकी काही पाणी ग्रामीण व लघु-उद्योगांसाठी पण उपयुक्त ठरणार असून, त्यामुळे काही प्रमाणात स्वयंरोजगारांसह रोजगारसंधी उपलब्ध होऊ घातल्या आहेत.

आयएपीडीआयसह जलतज्ज्ञांतर्फे करण्यात आलेल्या अभ्यासानुसार, या तज्ज्ञांच्या मते हे पाणी सर्व प्रकारच्या वापरासाठी योग्य असून, पिण्याच्या दृष्टीने त्याचा उपयोग करायचा झाल्यास पाण्यावर प्रक्रियेसह शुद्धीकरण करूनच त्याचा वापर करावा, असा सल्ला तज्ज्ञांनी दिला आहे. या संदर्भात आपल्या कोळसा खाणींमध्ये उपलब्ध असणाऱ्या पाण्याचा पाश्चिमात्य देशांमधील खाणींमधील पाण्याच्या संदर्भात तुलनात्मक अभ्यास करून सीएमपीडीआयने असे स्पष्ट केले आहे की, पाश्चिमात्य देशांमधील खाणींमध्ये करण्यात आलेल्या प्रक्रियांमुळे तेथील पाणी रसायनयुक्त असल्याने, विशेषतः मानवीय उपयोगांसाठी घातक ठरू शकते. भारतात मात्र येथील खाणींमध्ये अशी प्रक्रिया होत नसल्याने कोल इंडियाच्या खाणींमध्ये साठणाऱ्या व उपलब्ध असणाऱ्या पाण्याची उपयुक्तता निश्चितपणे उजवी व दर्जेदार ठरते.

याचेच प्रत्यंतर विविध अभ्यास आणि अहवालांमधून येत असते. सीएमपीडीआयचे जनसंपर्क अधिकारी कोल इंडियाअंतर्गत खाणींमध्ये उपलब्ध पाण्याचा ग्रामस्थांसाठी व विशेषतः त्याचा घरगुती व पिण्याच्या पाण्याच्या दृष्टीने वापर करण्याआधी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे पाण्याची संपूर्ण चाचणी केली जाते व मंडळाच्या अभ्यास आणि चाचणी प्रमाणपत्रानंतरच हे पाणी पिण्यायोग्य समजले जाते. त्यानुसार, संबंधित गरजू-ग्रामीण क्षेत्रातील रहिवाशांसाठी वापर केला जातो. खाणीतून पाणी या नव्या पाणीदार प्रयत्नांमुळे खाणक्षेत्रातील रहिवाशांची पाण्याची गरज व प्रसंगी तहान भागविण्याचे हे भगीरथ प्रयत्न म्हणूनच अभिनंदनीय ठरतात.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

### युवाशक्ती राष्ट्राचा आधारस्तंभ

युवा हे कोणत्याही राष्ट्राचे आधारस्तंभ असतात. ज्या राष्ट्राकडे समर्थ, सुशिक्षित, कर्तृत्ववान आणि नैतिक मूल्यांनी समृद्ध अशी युवकांची सेना आहे, ते राष्ट्र निश्चयाने प्रगतीच्या शिखरावर पोहोचते. म्हणूनच युवाशक्ती हीच खरी राष्ट्रशक्ती मानली जाते. आजच्या युवकांमध्ये अपार सामर्थ्य दडलेले आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, क्रीडा, साहित्य, कला, उद्योगधंदे अशा प्रत्येक क्षेत्रात ते नवीन उंची गाठत आहेत. बदलत्या काळानुसार स्वतःला घडवून घेण्याची क्षमता युवकांमध्ये प्रबळ असल्याने ते देशाला आधुनिकतेकडे आणि विकासाकडे नेणारे प्रमुख घटक ठरतात. एखाद्या राष्ट्राची खरी ताकद तिच्या भौतिक संपत्तीत नसून, त्या राष्ट्रातील ताज्या, ऊर्जावान आणि सर्जनशील युवा मनांत दडलेली असते. नव्या कल्पना, धाडसी निर्णय, आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख आणि बदल स्वीकारण्याची वृत्ती यामुळे युवा समाज कोणत्याही देशाच्या विकासात महत्त्वाची भूमिका निभावतो. भारतासारख्या विशाल देशात युवा वर्ग हा लोकसंख्येचा मोठा हिस्सा आहे, ही आपली सर्वांत मोठी संधी आहे. सुशिक्षित युवा राष्ट्राला नवीन संशोधन, तंत्रज्ञान आणि नावीन्यपूर्ण उपाय देतात. स्टार्टअप्स, नवे व्यवसाय आणि रोजगारनिर्मिती यात युवा आघाडीवर आहे. परंतु युवाशक्ती योग्य दिशेने प्रवाहित केली गेली तरच तिचा खरा लाभ राष्ट्राला मिळतो. तरुणांनी आपल्या क्षमतेचा योग्य वापर करून, जबाबदारीची जाणीव ठेवून आणि समाजहिताचा दृष्टिकोन बाळगून काम केले तर राष्ट्र प्रगत, सक्षम आणि समृद्ध होऊ शकते.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

## वाचक पत्रे

### नाशिक कुंभमेळा आणि पर्यावरणरक्षक

नाशिक कुंभमेळ्यासाठी साधुग्राममध्ये तात्पुरत्या सुविधा उभारण्यासाठी महापालिका प्रशासनाने तपोवन परिसरातील ५४ एकर जमिनीवरील सुमारे १८०० झाडे कापण्याची तयारी सुरू केली आहे. या प्रशासकीय निर्णयाला सुरुवातीपासूनच पर्यावरणप्रेमींकडून विरोध होत आहे. याच आंदोलनात चित्रपट अभिनेते सयाजी शिंदे यांनी उडी घेतली असून, ही झाडे वाचवण्यासाठी कोणतीही भूमिका घेण्यास तयार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. नाशिकमधील या वृक्षतोडीच्या विरोधात त्यांनी घेतलेली भूमिका आणि त्यासाठी त्यांनी वापरलेली साधू आले आणि गेले, काही फरक पडत नाही किंवा भगवे कपडे घालून आणि टिळे लावून कोणी साधू-संत होत नाही, झाड वाचवण्यासाठी संघर्ष करणारे नाशिककर हेच खरे साधू-संत आहेत यासारखी वक्तव्ये अनेक स्तरांवर चर्चेचा विषय ठरली आहेत. ज्या सह्याद्रीच्या पायथ्यापासून ते येतात, तेथील डोंगर तीस वर्षांपूर्वी विकासकामांसाठी उजाड झाले, तेव्हा त्यांची ही आक्रमकता, भाषाशैली दिसली नव्हती. तसेच, अलिकडे लवासा प्रकल्पासाठी जेव्हा तेथील आदिवासी लोकांची जमीन घेण्यात आली आणि पर्यावरणाचे नुकसान झाले, तेव्हाही त्यांचा हा तीव्र विरोध सार्वजनिकरीत्या दिसला नाही. यावरून असा प्रश्न निर्माण होतो की, एखाद्या विशिष्ट वेळी आणि विशिष्ट ठिकाणीच त्यांचा हा पर्यावरणवादी आवेश का दिसतो? त्यांच्या या भूमिकेमागे राजकीय, सामाजिक किंवा व्यक्तिगत असे कोणते घटक आहेत, ज्यांचा प्रभाव त्यांच्या कृतीवर पडतो? त्यांची ही भूमिका केवळ प्रसिद्धीसाठी आहे की खऱ्या पर्यावरण रक्षणासाठी, यावर प्रश्न निर्माण होतो.

**अविनाश देशपांडे**/९४२२९५०७५०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१**
या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

## आजचे संघगीत-६७

मंगळवार, ९ डिसेंबर २०२५

### ज्या क्षणाला या ध्वजाला कोटि कोटि वंदना

ज्या क्षणाला या ध्वजाला कोटि कोटि वंदना
तीच घटना जी स्वयंभू विजयशाली चेतना ॥धृ.॥

वाहुं दे हे स्वैर वारे घेउनी ही भावना
होउ दे अज्ञातमार्गे शक्तिची जोपासना ॥१॥

बोलणे जाते विरोनी अमर राही सत्कृती
हिंदुराष्ट्राच्या कृतीची दुमदुमे ही घोषणा ॥२॥

जाहले सम्राट हिंदू होउनी त्यांच्या स्मृती
येउ दे सरसावुनीया वीरसेना पूजना ॥३॥

भूषणे सिंहासने ती भूषणे समरांगणे
त्याग अथवा भोग दोन्ही शोभवीती जीवना ॥४॥

मित्र अथवा शत्रु येवो आडुनी वा रोखुनी
मारणारा कोण आम्हा धगधगे ही प्रेरणा ॥५॥

टाकुनीया भेद सारे प्रांत जाती मान्यता
ठाकली ही संघवृत्ती सिद्ध जी विजयार्जना ॥६॥

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# टाटा टेक्नॉलॉजीचे सीआयआयआयटी केंद्र परभणीत - पालकमंत्री मेघना साकोरे

**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर,/प्रतिनिधी-** परभणी जिल्ह्यासाठी ऐतिहासिक ठरणारा सेंटर फॉर इन्व्हेन्शन, इनोव्हेशन, इन्क्युबेशन अँड ट्रेनिंग सीआयआयटी प्रकल्प आता प्रत्यक्षात येण्याच्या मार्गावर असून, हा उपक्रम पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनामुळे मंजूर झाला आहे.

या सुमारे ११५ कोटी रुपयांच्या प्रकल्पातून दरवर्षी सुमारे ३,००० विद्यार्थ्यांना इंडस्ट्री ४.० युगाशी सुसंगत अत्याधुनिक तांत्रिक व उद्योगाभिमुख प्रशिक्षण मिळणार असून परभणीला कौशल्य विकासाच्या नकाशावर ठळक स्थान मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. सीआयआयआयटीआय केंद्रामुळे परभणी आणि आसपासच्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना इंडस्ट्री ४.० या साठी लागणारे कौशल्याचे प्रत्यक्ष प्रशिक्षण घेता येणार आहे, ज्यामुळे स्थानिक तरुणांची रोजगारक्षमता मोठ्या प्रमाणात वाढेल. मंत्री मेघना बोर्डीकरांनी ग्रामीण युवकांना शहरांकडे स्थलांतर न करता आपल्या जिल्ह्यातच गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण व रोजगार उपलब्ध व्हावा, हा दृष्टिकोन पुढे ठेवून हा प्रकल्प पुढे नेला आहे. केवळ



कौशल्य विकासापुरते मर्यादित न राहता मेघना बोर्डीकरांनी परभणीसाठी आयटी आणि स्टार्टअप क्षेत्रातही नवे दालन उघडले आहे. सेलू परिसरात सॉफ्टवेअर कंपन्यांची पावले वळवून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गावातूनच आयटी क्षेत्रात करिअर करण्याची संधी निर्माण करण्यात त्यांनी पुढाकार घेतला आहे. तरुणांनी ''नोकरी शोधणारे'' न राहता ''नोकरी निर्माण करणारे'' व्हावे, या उद्देशाने देवेंद्र फडणवीस स्टार्टअप मिशनच्या माध्यमातून नवउद्योजकांना मार्गदर्शन, मेंटॉरशिप आणि आवश्यक पाठबळ देणारे विविध उपक्रम राबवले जात आहेत. महिला सक्षमीकरण हा मेघना बोर्डीकरांच्या विकासदृष्टीचा आणखी एक महत्त्वाचा स्तंभ आहे. महिला बचत गटांना जोडून 'लखपती दीदी' संकल्पनेशी सुसंगत कौशल्य प्रशिक्षण, घरगुती व लघुउद्योगांसाठी मार्गदर्शन आणि बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले आहे, ज्यामुळे ग्रामीण महिलांचे उत्पन्न आणि आत्मविश्वास दोन्ही वाढत आहेत. पाणी, शेती, शिक्षण, आरोग्य या पारंपरिक विकासघटकांसोबत कौशल्य, स्टार्टअप आणि महिला सक्षमीकरण यांची सांगड घालून परभणीसाठी दीर्घकालीन विकासाचा रोडमॅप मेघना बोर्डीकरांनी मांडला आहे. सीआयआयआयटीआय केंद्र, ग्रामीण आयटी संधी, स्टार्टअप संस्कृती आणि महिला उद्योजकतेचा मजबूत पाया या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणून ''कौशल्यशाली, आत्मनिर्भर आणि प्रगत परभणी'' हे मेघना बोर्डीकरांचे स्वप्न आकार घेत आहे. विरोधकांच्या टीकेकडे न पाहता विकासाच्या अजेंड्यावर ठामपणे काम करणाऱ्या या तरुण नेत्या आता परभणीच्या भविष्यासाठी आश्वासक प्रतीक म्हणून पुढे येत आहेत. सदर सीआयआयआयटीआय सेंटरला मंजुरी मिळविण्यासाठी वसंतराव नाईक कृषी विद्यापीठाचे कुलगुरू इंद्रमणी, रजिस्ट्रार श्री. वेणीकर आणि परभणी अस्ट्रॉनोमिकल सोसायटी यांचे महत्त्वपूर्ण योगदान लाभले आहे.

## संक्षिप्त वृत्त...

### जिल्हयात वाढला थंडीचा जोर

**परभणी,/प्रतिनिधी :** गेल्या दोन दिवसांपासून शहरासह जिल्ह्यात चांगलीच थंडी पडली असून वातावरणातील या बदलामुळे सर्वसामान्य नागरीक चांगलेच हैराण झाले आहेत.

संपूर्ण जिल्ह्यात काही दिवसांपासून थंडीसह मोठ्या प्रमाणावर गारवा जाणवायला लागला आहे. विशेषतः सकाळी आणि रात्रीच्या वेळेत मोठ्या प्रमाणावर थंडी पडत आहे. जस जसा डिसेंबर महिना पुढे सरकत आहे. तसतसा तापमानाचा पारासुध्दा खाली सरकतांना आढळतो आहे. वातावरणात हलकासा बदल गेल्या दोन दिवसांपासून प्रकर्षाने जाणवत असून हुडहुडी भरणारी थंडी व गारव्याने नागरीकांनी स्वेटर्स, जाकेट्स बाहेर काढले आहेत. दरम्यान, राज्याच्या हवामान विभागाने येत्या काही दिवसात राज्यात मोठ्या प्रमाणावर थंडीची लाट येईल, असा इशारा दिला आहे.

### निकृष्ट दर्जाच्या रस्ते कामाविरोधात कामबंद आंदोलन

**परभणी,/प्रतिनिधी :** शहरातील मरीआई मंदिर ते धार रोड कॅनॉल तसेच खंडोबा बाजार ते महाराणा प्रताप पुतळा या मार्गांवरील रस्त्याचे काम विलंबाने आणि अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असल्यामुळे माजी सभापती महेमूद खान यांच्या मार्गदर्शनाखाली आज कामबंद आंदोलन करण्यात आले.

या रस्त्यांसाठी सुमारे ६० कोटी रुपयांचा निधी २०२२ मध्येच मंजूर झाला आहे. मात्र निधी मंजूर होऊन तीन वर्षे उलटूनही काम संथ गतीने सुरू असून, कामाचा दर्जा अत्यंत निकृष्ट आहे. रस्त्यांवरील खड्डे, धुळीकण आणि असमतोल पृष्ठभागामुळे नागरिकांना दररोज मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. वाढती वाहतूक कोंडी आणि त्यामुळे वाढलेल्या अपघातांच्या घटनांबाबत नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. दीर्घकाळाच्या दुर्लक्षाला कंटाळून आज आंदोलनकर्त्यांनी प्रत्यक्ष कामबंद आंदोलन छेडत कॉन्ट्रॅक्टरची कानउघडणी केली. रस्ते कामे वेळेत, नियोजनबद्ध पद्धतीने आणि उच्च दर्जात पूर्ण करण्यात यावीत, अशी ठाम मागणी यावेळी नोंदविण्यात आली.

या आंदोलनात विशाल बुधवंत, एहसान खान, महमूद खान मित्र मंडळ, एहसान खान मित्र मंडळ यांसह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत रस्ते कामांच्या सुधारणा आणि वेगवान अंमलबजावणीची मागणी जोरदारपणे मांडली.

### शांतिदूत सेवाभावी संस्थेच्यावतीने २०१ गरजूंना गरम ब्लँकेटचे वाटप

**परभणी,/प्रतिनिधी :** येथील शांतिदूत सेवाभावी संस्थेच्यावतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही हिवाळ्याच्या कडाक्यापासून संरक्षण मिळावे म्हणून २०१ गरजू महिला व पुरुषांना मोफत गरम ब्लँकेटचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शांतिदूत सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष सुभाषचंद्र सारडा होते. प्रमुख पाहुणे म्हणून ॲड. एम.के. उबाळे, डॉ. दिनेश भुतडा, डॉ. स्मिता भुतडा, प्राचार्य सुरेश नाईकवाडे, डॉ. रितेश अग्रवाल, सौ. वर्षा सारडा, श्यामसुंदर सारडा आणि नेहा सारडा उपस्थित होते.

शांतिदूत सेवाभावी संस्था मागील २५ वर्षांपासून हिवाळ्याच्या दिवसांत गरम ब्लँकेटचे वाटप हा उपक्रम सातत्याने राबवत आहे. या उपक्रमाबाबत बोलताना संस्थापक अध्यक्ष सुभाषचंद्र सारडा म्हणाले की, गरजूंना दीपावली काळात मोफत कपडे व मिठाई, हिवाळ्यात गरम ब्लँकेट तर उन्हाळ्यात महिनाभर मोफत पाणीवाटप असे उपक्रम संस्था अखंडितपणे गेल्या २५ वर्षांपासून राबवत आहे. गरजू आणि गोरगरिबांप्रती शांतिदूत संस्थेची कटीबद्धता कायम राहील, असा विश्वास व्यक्त केला. या कार्यक्रमाला स्थानिक प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी माधव सारडा, करण सारडा, गौरव बाहेती, शोएब चाऊस आणि अण्णा कंची यांनी विशेष परिश्रम घेतले.

### शिवसेना ठाकरे गटाच्या बोरी तालुका प्रमुखपदी कृष्णा राऊत यांची नियुक्ती

**परभणी,/प्रतिनिधी :** शिवसेना उध्दव ठाकरे गटाच्या बोरी तालुका प्रमुख पदी (प्रभारी) कृष्णा निवृत्तीराव राऊत यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार तसेच शिवसेना नेते अंबादास दानवे व उपनेते खासदार संजय (बंडू) जाधव यांच्या सूचनेनुसार राऊत यांची ही नियुक्ती करण्यात आली असून ५ डिसेंबर रोजी जिल्हाप्रमुख रविंद्र रामकिशन धर्मे यांच्या स्वाक्षरीने त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. राऊत यांच्या या नियुक्तीमुळे स्थानिक पातळीवर पक्षाची संघटनात्मक ताकद वाढण्यास मोठी चालना मिळेल, आगामी काळात पक्षवाढ आणि स्थानिक कार्यकर्त्यांच्या सक्रीय सहभागासाठी राऊत प्रभावी भूमिका निभावतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात असून त्यांचे अभिनंदन होत आहे. जिल्हाप्रमुख रविंद्र धर्मे यांनी दिलेल्या संदेशात, कार्यकर्त्यांचा विश्वास जपत पक्षवाढीसाठी आपण महत्त्वपूर्ण योगदान द्याल, असा विश्वास व्यक्त केला.

### रेनाखळी शिवारात पुन्हा बिबट्याचा मागोवा; ट्रॅप कॅमेरात हालचाली कैद

**परभणी,/प्रतिनिधी :** पाथरी तालुक्यातील रेनाखळी शिवारात बिबट्याचा वावर सुरूच असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. काही दिवसांपूर्वी या भागात बिबट्याने दोन गाईंचा फडशा पाडल्याची घटना घडल्यानंतर वन विभागाने बसवलेल्या ट्रॅप कॅमेरात रविवारी बिबट्याचा वावर स्पष्ट दिसून आले.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.

**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, ०२. **पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०३. **मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,

०४. **पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०५. **सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

## अवैध रेती उत्खननाविरुद्ध कडक पावले उचला- जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण



**परभणी,/प्रतिनिधी:** जिल्ह्यात अवैध रेती उत्खननावर लगाम घालण्यासाठी महसूल विभागाने धडाकेबाज कारवाई सुरू केली असून, पाथरी तालुक्यातील मौजे गौंडगाव येथे छापा टाकून मोठ्या प्रमाणावरील अवैध रेती उत्खननाची सामग्री जप्त करून नष्ट करण्यात आली.
ही कारवाई पाथरीच्या उपविभागीय अधिकारी संगीता चव्हाण व तहसीलदार शंकर हंडेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली नायब तहसीलदार श्री. धोपे, मंडळ अधिकारी श्री. बागुल, तलाठी श्री. साजिद, श्री. तायनक, कोतवाल श्री. चव्हाण यांच्या पथकाने केली. या छाप्यात अवैध उत्खननासाठी वापरण्यात येणारे चार तराफे, पाईप, उपकरणे व अन्य साहित्य जाळून नष्ट करण्यात आले.

दरम्यान, जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी महसूल विभागाच्या या कारवाईचे कौतुक करत अधिकाऱ्यांना नियमित तपासण्या व सतत छापे टाकण्याच्या सूचना दिल्या.

त्यांनी इतर संबंधित विभागांनाही कारवाईत सक्रिय सहभागाची सूचना केली आहे, ज्यामुळे अनधिकृत उत्खननाचे जाळे पूर्णपणे नष्ट होईल. त्यांनी सांगितले की, अवैध उत्खनन व वाहतूक प्रभावीपणे थांबवावी. प्रत्यक्ष मैदानात उतरून कारवाई करावी, दोषींवर कठोर कारवाई करून दंडात्मक पावले उचलावीत.
दरम्यान, मौजे गुंज येथे अवैध वाळूसाठा जप्त करण्यात आले. सदर कारवाईमुळे अवैध रेती उत्खननकर्त्यांमध्ये मोठी धास्ती निर्माण झाली आहे.

### सावंगी खु. परिसरात रोही प्राण्यांचा उच्छाद

**परभणी,/प्रतिनिधी :** तालुक्यातील सावंगी खुर्द परिसरात रोही प्राण्यांचा उच्छाद वाढत असून शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. यापूर्वी हरीण आणि रानडुकऱ्यांमुळे पिकांची हानी होत होती; मात्र आता रोही प्राण्यांनीही उगवत्या गहू, हरभरा आणि अन्य पिकांची नासधूस सुरू केली आहे. रोही हे प्राणी हिंसक नसले तरी शेतात घुसून पिकांची हानी करत असल्याने शेतकरी संतप्त आहेत.

शेतकऱ्यांनी जिल्हा प्रशासन व वन विभागाने या समस्येची तातडीने दखल घेऊन प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे. विशेषतः मागील काही दिवसांपासून परभणीसह राज्यातील अनेक भागांत बिबट्यांचे दर्शन होत असल्याने भीतीचे वातावरण आहे. वन विभागाकडे तक्रारी करूनही शेतकऱ्यांना केवळ तुटपुंजी मदत मिळत असल्याची खंत शेतकऱ्यांद्वारे व्यक्त केली जात आहे. रानडुकरांच्या हल्ल्यात जखमी झालेल्या नागरिकांना परभणी जिल्हा रुग्णालयात योग्य उपचार किंवा निदान मिळत नसल्याची तक्रारही दिली होती.

## सेलूतील विवेकानंद विद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

**सेलू,/प्रतिनिधी-** शहरातील भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई संचलित विवेकानंद विद्यालयात महापरिनिर्वाण दिनानिमित्त (६ डिसेंबर ) महामानव भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले.

प्रारंभी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला.व्यासपीठावर मुख्याध्यापक नामदेव एकशिंगे व मुख्य वक्ता सहशिक्षक गजानन साळवे उपस्थित होते.गजानन साळवे यांनी डॉ.बाबासाहेबांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला.साळवे म्हणाले की,संविधान निर्मितीसाठी बाबासाहेबांचे मोठे योगदान आहे. जनतेच्या मनामनात समाज क्रांतीचे स्फुल्लींग चेतवून त्यांना जागृत करण्याचे कार्य बाबासाहेबांनी केले.विद्यार्थ्यांनी ज्ञानार्जन हे एकच ध्येय बाळगावे तसेच शिक्षणाच्या माध्यमातून प्रगती करावी असे मत व्यक्त केले.मुख्याध्यापक एकशिंगे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद करताना सांगितले की,कठीण परिस्थितीला सामोरे जाऊन आपण यश कसे प्राप्त करायचे हे बाबासाहेबांच्या जीवन प्रवासावरून आपण शिकले पाहिजे तसेच ध्येय प्राप्ती साठी शिकले पाहिजे असे प्रतिपादन केले.




## मानवत बडोदा बँकेमध्ये शेतकऱ्यांची अडवणूक - जाधव

**मानवत,/प्रतिनिधी-** बडोदा बँकच्या शाखेमध्ये मागील दोन वर्षापासून बबन रामचंद्र पिसे राहणार शेवडी जहांगीर हा शेतकरी सतत चकरा मारत आहे २३ -१२ -२०२३ रोजी यांनी बँकेत ठेवलेले सोने याच्यावरील मुद्दल व व्याजासहित रक्कम भरली परंतु शेतकऱ्याला सोने परत दिले नाही बँक प्रशासनाने या शेतकऱ्याची फसवणूक केली.

बैंक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda

गेल्या दोन वर्षापासून शेतकरी सतत बँकेत चकरा मारत आहे जानेवारी महिन्यामध्ये शेतकऱ्याच्या मुलीचे लग्न असल्याकारणाने शेतकरी हातबल झालेला आहे बँक प्रशासन उडवाउडवीचे उत्तर देत आहेत दिनांक १२ -१२ -२०२५ रोजी पर्यंत शेतकऱ्याला त्याचे सोने परत न झाल्यास शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष व मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष यांच्या वतीने बँक ऑफ बडोदा मानवत शाखेला टाळे ठोकण्यात येणार आहेत याची सर्वस्व जबाबदारी बँक प्रशासनावर राहील. या निवेदनावर शिवसेना शहर प्रमुख अनिल जाधव, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष सचिव कॉ रामराजे महाडिक, शिवाजीराव हिंगे उपसभापती पंचायत समिती मानवत, बबन रामचंद्र पिसे, हरिभाऊ काळे, इत्यादींच्या स्वाक्षरी आहेत.

## शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षात नवी दमदार भर

### कृष्णा राऊत यांची बोरी तालुका प्रमुख म्हणून नियुक्ती

**परभणी,/प्रतिनिधी-** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या संघटनात्मक बळकटीसाठी महत्त्वाचा निर्णय घेत परभणी जिल्ह्यातील बोरी (ता. जिंतूर) येथे नवीन नेतृत्वाची निवड जाहीर करण्यात आली आहे. पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार तसेच शिवसेना नेते अंबादास दानवे व उपनेते खा. संजय (बंडू) जाधव यांच्या सूचनेनुसार कृष्णा निवृत्तीराव राऊत यांची बोरी तालुका प्रमुख (प्रभारी) म्हणून अधिकृत नियुक्ती करण्यात आली आहे. दिनांक ५ डिसेंबर २०२५ रोजी या नियुक्तीपत्रावर जिल्हाप्रमुख रविंद्र रामकिशन धर्मे यांच्या सहीने आदेश जाहीर झाला.

नवीन नियुक्तीमुळे स्थानिक पातळीवर पक्षाची संघटनात्मक ताकद वाढण्यास मोठी चालना मिळणार असल्याचे पक्ष पदाधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. बाळासाहेब



ठाकरे व पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या विचारांचा प्रसार तळागाळात करण्याची जबाबदारी कृष्णा राऊत यांच्यावर सोपवण्यात आली आहे. बोरी तालुक्यातील कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, आगामी काळात पक्षवाढीसाठी ते सक्रीय पुढाकार घेतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

या निवडीमुळे स्थानिक नेतृत्वाला नवीन ऊर्जा मिळाली असून राऊत यांचे कार्यकर्त्यांकडून स्वागत करण्यात येत आहे. जिल्हाप्रमुख रविंद्र धर्मे यांनी दिलेल्या अभिनंदनपर संदेशात, ''कार्यकर्त्यांच्या विश्वासाला पात्र ठरत आपण पक्षवाढीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान द्याल,'' अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. नव्या जबाबदारीसाठी राऊत यांना कार्यकर्ते व पदाधिकारी यांच्याकडून हार्दिक शुभेच्छा मिळत असून आगामी राजकीय वाटचालीत त्यांच्या नेतृत्वाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## जग मोबाईलच्या विळख्यात अडकल्यामुळे आई-वडिलांनी आपल्या पाल्यांकडे विशेष लक्ष द्यावे- युवकांसमोरील आधुनिक आव्हानांवर प्रा.एम.एम.सुरनर यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**गंगाखेड ,/प्रतिनिधी-** तालुक्यातील मौजे इळेगाव येथे राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) आयोजित विशेष श्रमिक शिबिरात युवाव्याख्याते प्रा.एम.एम. सुरनर यांनी ''आजच्या आधुनिक शिक्षणातील युवकांसमोरील आव्हाने'' या अत्यंत संवेदनशील आणि काळाची गरज भासणाऱ्या विषयावर सखोल व परिणामकारक मार्गदर्शन केले. त्यांच्या अभ्यासपूर्ण, प्रभावी आणि जिवंत शैलीतील प्रबोधनाने ग्रामस्थ, युवक व विद्यार्थ्यांचे मनोमन परिवर्तन घडविणारा ठसा उमटवला.

आपल्या भाषणात प्रा. सुरनर यांनी सांगितले की आजचे शिक्षण फक्त पातळीवर बदलले नाही तर युवकांची मानसिक आणि सामाजिक परिस्थितीदेखील बदलली आहे. उद्योग, नोकरी, करिअर यातील स्पर्धा वाढल्याने तरुणांमध्ये ताण,दिशाभ्रम वाढला आहे.मोबाईलच्या अतिरेकामुळे युवकांचे एकाग्रता, वाचन, अभ्यास, कुटुंबातील संवाद आणि संस्कार कमी होत असून:,नैराश्य,व्यसन, हिंसक प्रवृत्ती,सामाजिक तुटकपणा




यांचा मोठ्या प्रमाणात विस्तार होत आहे.प्रा.सुरनर म्हणाले,''जग मोबाईलच्या जाळ्यात अडकलं आहे. भविष्यातील पिढी वाचवायची असेल तर पालक व शिक्षकांनी मिळून मुलांवर लक्ष ठेवणे अत्यावश्यक आहे.''

आजच्या पिढीत नैतिक मूल्ये, कृतज्ञता, संयम व जबाबदारी कमी होत असून ही चिंतेची बाब आहे.संस्कार देण्याची मूलभूत जबाबदारी आई-वडीलांची, त्यानंतर शाळा,समाजाची असल्याचे त्यांनी ठणकावून सांगितले.या कार्यक्रमास गावचे सरपंच काळे, प्रा.डॉ. गुडदे,व्याख्याते प्रा.तुकाराम बोबडे,अध्यक्ष धापसे, कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.बालाजी शिंदे,प्रा.गडमे,विद्यार्थी,महिला मंडळ तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्र संचालन युनूस यांनी केले तर आभार प्रा.गडमे यांनी मानले.शिबिर यशस्वी करण्यासाठी एनएसएस स्वयंसेवकांच्या कष्टाचे विशेष कौतुक करण्यात आले.हा कार्यक्रम केवळ व्याख्यान नव्हता; तर आधुनिक युगातील युवकांच्या समस्या, शिक्षणातील बदलते स्वरूप आणि समाजाची जबाबदारी या सर्वांचा वेध घेणारा परिवर्तनकारी, प्रबोधनात्मक उपक्रम ठरला.

# बीडमध्ये तीन पैशाचा तमाशा नाटकाचे उत्कृष्ट सादरीकरण







**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.९ डिसेंबर**

बीडच्या अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेतर्फे हौशी मराठी राज्य नाट्य स्पर्धेत बर्टोल्ट ब्रेक्त (अनुवाद –पू.ल.देशपांडे) लिखीत व असलम युनूस दिग्दर्शीत 'तीन पैशाचा तमाशा' या नाटकाचे दि.६ डिसेंबर रोजी उत्कृष्ट सादरीकरण झाले.

भिकाऱ्यांचे सोंग घेऊन व्यवसाय करणारे रॅकेट, गुन्हेगारी, गरीब श्रीमंत दरी, कायद्याचा दुरुपयोग करणारे यावर विनोदी व व्यंगात्मक पद्धतीने भाष्य करणारे हे नाटक असून नेपथ्य, संगीत, प्रकाश, रंगभूषा– वेशभूषा यामुळे प्रेक्षकांना ते भावले असल्याचे कलाकारांनी सांगितले. शहरातील सौ.के.एस.के. महाविद्यालय, नाट्यशास्त्र विभागाच्या सहकार्याने हा प्रयोग पार पडल्याचे डॉ. संजय पाटील देवळाणकर यांनी सांगितले. आव्हानात्मक असलेल्या या नाटकासाठी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या अध्यक्षा डॉ.दिपा क्षीरसागर यांनी मार्गदर्शन केले. दरम्यान, जागतिक पातळीवरील दर्जेदार नाटके मराठीत अनुवाद होऊन अधिकाधिक नाट्य प्रयोग व्हायला पाहिजे या अनुषंगाने तीन पैशाचा तमाशा या नाटकाचे विशेष महत्व असल्याचे दिग्दर्शक असलम युनूस यांनी सांगितले.

या नाटकात सहभागी कलावंत

यशराज सवई, अभिषेक इनकर, स्नेहा व्हरकटे, निकीता काशीद, अभिषेक घुले, शैलेश थोरात, सागर धनवे, शुभम पाटोळे, किरण काळे, मिलींद शिवनीकर, कोयल काळे, तनिष्का देवकर, शरद भांगरे, सायली गायकवाड, शिवराज झांबरे, मिलींद शिवनीकर, निखील काकडे, संस्कृती अंधारे, प्रणिता वीर आणि वाल्मीक गाणार यांनी भूमिका केल्या असून तांत्रिक कलावंत म्हणून खालील कलाकारांनी सहभाग नोंदवला. नेपथ्य –अमित गाढे, प्रकाश योजना– अशोक घोलप, अमन तांगडे, संगीत संयोजन– पवन शिंदे, संगीत सहाय्य– आविष्कार क्षीरसागर, ज्ञानेश्वर बिचुकले, तृप्ती दराडे, रंगभूषा आणि वेशभूषा– प्रा.डॉ. संजय पाटील देवळाणकर, रंगमंच व्यवस्था– मिलींद शिवनीकर, कबीर जाधव, सहकार्य डॉ. दुष्यंता रामटेके, प्रा.विजय राख.





बीड शहरातील वर्दळीचे ठिकाण असणाऱ्या मुख्य स्टेडियम रस्त्याची झालेली दुरवस्था नागरिकांना खड्ड्यातून वाहने चालवावी लागतात. (छाया-कृष्णा शिंदे)

## विधानपरिषदेतील लक्षवेधीला मंत्री पंकजा मुंडेंचे उत्तर

### नाग नदी प्रदूषण निर्मूलनासाठीची कामे तातडीने पूर्ण करण्याचा प्रयत्न

**तभा वृत्तसेवा**
**नागपूर दि.९ डिसेंबर**

राष्ट्रीय नदी संवर्धन योजनेंतर्गत नागपूर येथील नाग नदी प्रदूषण प्रतिबंध प्रकल्पाच्या १,९२६ कोटींच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. या प्रकल्पाची कामे तातडीने पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात येईल, असे पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांनी विधान परिषदेत सांगितले.



सदस्य डॉ.परिणय फुके यांनी नाग नदी प्रदूषणाबाबत लक्षवेधी सूचना मांडली होती. या अनुषंगाने झालेल्या चर्चेत सदस्य प्रसाद लाड यांनी सहभाग घेतला. यावर पंकजाताई मुंडे यांनी सभागृहात परफेक्ट उत्तर दिले.

पर्यावरणाबाबत करण्यात येत असलेल्या उपाययोजनांबाबत माहिती देताना मंत्री पंकजाताई मुंडे म्हणाल्या, नाग नदी प्रदूषण निर्मूलनाबाबत एकूण पाच पॅकेजेसमध्ये कामाचे नियोजन केले जात आहे. यामध्ये एसटीपी, सिवरेज लाईन, विद्युत शव दाहिनी आदींचा समावेश आहे. नाग नदी प्रदूषण निर्मूलन प्रकल्पांतर्गत ९२ दशलक्ष लिटर प्रतिदिन क्षमतेचे मलजल शुद्धीकरण केंद्र प्रस्तावित आहे. नदीच्या पाण्यावर प्रक्रिया करून ते पुढे सोडण्यात येत आहे, त्यामुळे गोसीखुर्द धरणातील मासेमारी नियमित सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

एसटीपी प्रकल्पांपैकी ११ प्रकल्प बंद असल्याबाबत सदस्य डॉ.परिणय फुके यांनी दिलेल्या माहितीनुसार याबाबत एका समितीच्या माध्यमातून पुन्हा तपासणी करून आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असेही पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी यावेळी सांगितले. पर्यावरण उपाययोजनांसाठी जागतिक पातळीवरील तज्ज्ञांची देखील मदत घेण्यात येत असल्याची माहिती देऊन जायका कंपनीच्या निकषांनुसार सर्व कामे करण्यात येत असून सर्व कामे नियोजित वेळेपूर्वी पूर्ण करण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

## जलयुक्त शिवार २.0 योजने अंतर्गत समाविष्ठ असलेल्या कामांचे त्रयस्थ मुल्यमापनासाठी खालील संस्था पात्रता

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.९ डिसेंबर**

जलयुक्त शिवार २.० अभियान महाराष्ट्रामध्ये राबविण्यात येत आहे. सदर अभियाना अंतर्गत होणा-या कामाचे त्रयस्थ मुल्यमापण करण्यासाठी मृद व जलसंधारण विभागाचे प्राप्त शासनाच्या निर्देशानुसार बीड जिल्ह्यामध्ये जलयुक्त शिवार २.० अंतर्गत झालेल्या सर्व कामांचे त्रयस्थ मुल्यमापनासाठी खालील संस्था पात्र राहतील असे जिल्हा जलसंधारण अधिकारी तथा जिल्हा प्रगणना नोडल अधिकारी मृद व जलसंधारण विभाग बीड यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

शासकिय अभियांत्रिकी महाविद्यालय,शासकिय तंत्रनिकेतन महाविद्यालय,जलसंधारण कामांचा अनुभव असलेल्या स्वयंसेवी संस्था, खडज मानांकित खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालय.बीड जिल्ह्यामध्ये जलयुक्त शिवार २.० अंतर्गत झालेल्या कामांचे त्रयस्थ मुल्यमापन काम करण्यास इच्छुक संस्थांनी दि.५ डिसेंबर २०२५ पर्यंत आपले परिपुर्ण प्रस्ताव जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, बीड या कार्यालयास सादर करावेत.

अनुभवी संस्थांना प्राधान्य देण्यात येईल याची नोंद ध्यावी. तसेच शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार मानधनाबाबत जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, बीड यांचेमार्फत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

प्राप्त प्रस्तावावरती चर्चा करुन सक्षम संस्थेची निवड करण्यात येईल. अधिक माहितीसाठी संपर्क जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, जायकवाडी कॉलनी, नगर रोड बीड-४३११२२ येथे संपर्क साधावा. ई-मेल आयडी: cemilsdivbeedgmail.co

## अखिल भारतीय कार्यकारिणीत देवगिरी प्रांताची दुहेरी नोंद

### डॉ.रवी सातभाई युवा इतिहासकार; डॉ. राधाकृष्ण जोशी यांची पश्चिम क्षेत्रीय संघटन सचिवपदी पुनर्निवड



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.९ डिसेंबर**

अखिल भारतीय इतिहास संकलन योजना, नवी दिल्ली यांच्या १३ व्या राष्ट्रीय महाधिवेशनाचे आयोजन दिनांक ५ ते ७ डिसेंबर २०२५ या कालावधीत श्री माधव जनसेवा न्यास, पट्टीकल्याण, समालखा येथे पार पडत आहे. भारतीय इतिहास, संस्कृती आणि संविधान या विषयावर आधारित या अधिवेशनात देशभरातील संशोधक, इतिहासकार आणि कार्यकर्ते उपस्थित आहेत.

महाधिवेशनातील दुसर्या दिवशी पार पडलेल्या सर्वसाधारण सभेत, नवीन राष्ट्रीय कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. यावेळी देवगिरी प्रांतासाठी दोन महत्त्वाची निवडी घोषित झाल्या. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. राधाकृष्ण जोशी यांची पश्चिम क्षेत्रीय संघटन सचिव म्हणून दुसऱ्यांदा तीन वर्षांसाठी पुनर्निवड करण्यात आली. २०२२-२०२५ या मागील कार्यकाळात त्यांनी हे पद सांभाळले असून त्यांच्या कार्याचा सकारात्मक अनुभव लक्षात घेता त्यांना पुन्हा संधी देण्यात आली.

याच सभेत डॉ. रवी सुभाषराव सातभाई यांची अखिल भारतीय युवा इतिहासकार म्हणून निवड करण्यात आली. देवगिरी प्रांताचे संघटन सचिव म्हणून ते कार्यरत असून, त्यांचा राष्ट्रीय कार्यकारिणीत प्रथमच समावेश झाला आहे.

निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. अरविंद जामखेड यांनी निवडणूक प्रक्रिया सुरू केली. सर्वानुमते डॉ. ईश्वरशरण विश्वकर्मा यांची प्रथम अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. त्यानंतर राष्ट्रीय अध्यक्ष ईश्वरशरण विश्वकर्मा यांनी नविन कार्यकारिणी ची सर्वानुमते एकमताने घोषणा केली. निवडींची घोषणा झाल्यानंतर डॉ. अरविंद जामखेड (उपाध्यक्ष), बालमुकुंद पांडे (संघटन सचिव), हेमतधिंग मुजुमदार (महामंत्री), संजय श्रीहर्ष (सहसंघटन सचिव) यांनी या दोन्ही निवडीत प्रतिनिधींचे अभिनंदन केले.नवीन जबाबदाऱ्या स्वीकारताना दोघांनीही संस्थेने दाखवलेल्या विश्वासाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आणि राष्ट्रीय स्तरावर इतिहास संकलनाच्या कार्यात सक्रिय व जबाबदारीने योगदान देण्याचा निश्चय केला. देवगिरी प्रांतात या निर्णयांचे स्वागत होत असून, प्रांताचे संशोधन आणि संघटनात्मक कार्य राष्ट्रीय स्तरावर आणखी बळकट होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

## छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या ऊस बिलाचा हप्ता रु. २७५०/- प्रमाणे बँकेत वर्ग - व्हा. चेअरमन मोहनराव जगताप

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.९ डिसेंबर**

छत्रपती सहकारी साखर कारखाना लि. सोनोजीनगर सावरगाव ता. माजलगाव जि. बीड या कारखान्याचा गळीत हंगाम २०२५-२६ मधील दि.०१/११/२०२५ ते १५/११/२०२५ या कालावधीत एकूण ४५५४२.९९० मे. टन ऊसाचे गाळप झाले आहे. त्यानुसार प्रति टन रु. २७५०/- प्रमाणे एकूण रक्कम रु. १२,५२,४३,२९६/- रुपये शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वर्ग करण्यात आले आहेत.



काही दिवसांपूर्वी युवा शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने ऊस दरवाढीबाबत आंदोलन पुकारण्यात आले होते. या आंदोलनकर्त्यांशी चर्चा करून छत्रपती सहकारी साखर कारखान्याने प्रति टन २७५०/- रुपये भाव जाहीर केला आणि तो एकरकमी देण्याचे घोषित केले होते, आंदोलकांनी हे मान्य करून याचे स्वागत केले. आज युवा शेतकरी संघर्ष समितीच्या आंदोलकांचा सन्मान करत दि.०१ नोव्हेंबर २०२५ ते १५ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत गाळप झालेल्या ऊसाचे बिल शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वर्ग करण्यात आले आहेत.

कारखान्याच्या कार्यक्षमतेत वाढ करण्यासाठी प्रशासनाने योग्य नियोजन करून ऊसाचे गाळप सुरळीत सुरू ठेवले असून सर्व शेतकऱ्यांचे बिल वेळेवर बँकेत जमा करण्यात येणार असल्याचे सांगितले आहे.

कारखान्याचे चेअरमन मा. बाजीराव सोनोजीराव जगताप व संचालक मंडळ यांनी कारखान्याची गाळप क्षमता मर्यादित असतानाही शेतकऱ्यांच्या हिताचे धोरण अवलंबून कोणताही बाय-प्रॉडक्ट नसतांना सुद्धा योग्य भाव दिला आहे. भागातील सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आपल्या कारखान्यास सहकार्य करावे व आपापली बिले संबंधित बँकेत संपर्क करून मिळवावीत, अशी विनंती कारखाना प्रशासनाकडून करण्यात आली आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# रूग्णसेवा हीच खरी इश सेवा– पोपळाईत

## लोकसेवा मंडळ संभाजीनगर अंतर्गत रूग्ण मित्रांचे स्नेहसंमेलन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ डिसेंबर**

शासकीय सेवा संपल्यानंतर समाजसेवा म्हणून लोकसेवा मंडळ संभाजीनगर अंतर्गत ४० पुरूष आणि २५ महिला येथील शासकीय रूग्णालयातील नियमित निशुल्क सेवा देत आहेत. रूग्णसेवा हीच खरी इश सेवा आहे, असे प्रतिपादन रूग्ण मित्र तथा सवोनिवृत्त कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष मनोहर पोपळाईत यांनी केले.

येथील स्वामी विवेकानंद नगर येथील दत्त मंदिराच्या सभागृहात मंगळवारी लोकसेवा मंडळ संभाजीनगर अंतर्गत रूग्ण मित्रांचे स्नेहसंमेलन आणि आढावा बैठक पार पडली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी सेवा निवृत्त कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष मनोहर पोपळाईत तर प्रमुख पाहुणे म्हणून देवगिरी प्रांतचे रूग्ण प्रमुख शशीकांत चिंतामणी, संपर्क प्रमुख डॉ संजय भालेराव, माजी प्राचार्य गणेश पौळ, स्वाती वरखेडकर यांची उपस्थिती होती.

रूग्ण मित्रांनी २०२५ मध्ये १ लाख ३ हजार ७०० रूग्ण व दिव्यांगांना सेवेचा लाभ दिला. रूग्ण मित्र मंडळाचे काम सर्वोत्कृष्ट व प्रशंसनीय आहे. यावेळी रूग्ण मित्रांचा गौरव करण्यात आला. शासकीय सेवेनंतर रूग्णांची सेवा करण्यासाठी हे सर्व रूग्ण मित्र स्नहेसंमेलनानिमित्त एकत्र आले होते. यावेळी रूग्ण मित्र मंडळाचा आढावा घेण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा धनंजय कुलकर्णी यांनी केले संभाजी नगर येथे रूग्णांच्या नातेवाईकांसाठी अत्यंत अल्पदरात निवास व्यवस्थेसाठी बांधलेल्या रूग्णसेवा सदना बाबत माहीती देण्यात आली.

यावेळी संमेलनात गोविंद घनतोडे, कैलास काबरा, स्वाती भालेराव, राणी खिल्लारी, शंकर पुरी, अश–ोक मार्कड, अर्चना खंदारे, किशोर भालेराव यांनी आपले सेवेचे अनुभव कथन केले. तसेच राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक एम एम राऊत यांनी मनुष्य जीवनाची सार्थकता करून मागे किर्ती राहण्यासाठी रूग्णसेवेबरोबर ९४ सत्कर्म जीवनात करावी याबाबत माहीती दिली. यावेळी हिंगोलीकरांना रूग्णसेवेची संधी दिल्याबद्दल लोकसेवा मंडळ संभाजीनगर यांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सुर्यकांत राजुलवार यांनी केले तर आभार एम एम राऊत यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दत्तात्रय म्हेत्रे, सुरेश चिटकरे, प्रकाश ठाकरे, साहेबराव बांगर, शिवानंद बेंडके, दिनकर नाईक, राऊत यांनी परिश्रम घेतले. यावेळी विश्वास वानखेडे, नंदकिशोर भालेराव, शामराव कावरखे, अशोक भालेराव, सुषमा होकर्णे, मंगला काळे, सुनीता जयस्वाल, कोल्हे, संजन घनतोडे, रंजना ठाकरे, अर्चना खंदारेसह ४० रूग्ण मित्र उपस्थित होते.

# मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्तीचे प्रस्ताव वेळेत सादर करा– गीता गुठ्ठे

## प्रस्ताव दाखल न केल्यास होणार कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ डिसेंबर**

शैक्षणिक वर्ष सन २०२५–२६ करीता मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजना ऑनलाईन पद्धतीने प्रभावीपणे राबविण्याच्या उद्देशाने हिंगोली जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये मुख्याध्यापक व शिष्यवृत्ती कामकाज पाहणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्हा समाज कल्याण कार्यालयामार्फत सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना (इ. ५ वी ते १० वी), अनुसूचित जातीसाठी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे शिक्षण फी व परीक्षा फी प्रतिपूर्ती योजना (इ. १० वी), माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती, भारत सरकार मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजना (इ. ९ वी व १० वी) तसेच अस्वच्छ व्यवसाय करणाऱ्या पालकांच्या पाल्यांना शिष्यवृत्ती योजना इत्यादी मॅट्रीकपूर्व योजना ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येत आहेत. प्रत्येक पात्र विद्यार्थ्यास शिष्यवृत्तीचा लाभ मिळावा, यासाठी ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. तालुकानिहाय कार्यशाळांचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे. हिंग–ोली तालुक्यासाठी आज सोमवार, दि. ८ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता, सामाजिक न्याय भवन, हिंगोली येथे आयोजन करण्यात आले आहे. कळमनुरी तालुक्यासाठी मंगळवार, दि. ९ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता, पंचायत समिती, कळमनुरी येथे, औंढा नागनाथ तालुक्यासाठी बुधवार, दि. १० डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता, पंचायत समिती, औंढा नागनाथ येथे, सेनगाव तालुक्यासाठी गुरुवार, दि. ११ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता, पंचायत समिती, सेनगाव येथे तर वसमत तालुक्यासाठी शुक्रवार, दि. १२ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता, पंचायत समिती, वसमत येथे कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहेत.

हिंगोली जिल्ह्यातील सर्व शाळांचे मुख्याध्यापक व संबंधित शिष्यवृत्ती कामकाज पाहणाऱ्या कर्मचाऱ्यांनी सदर कार्यशाळेस उपस्थित राहणे अनिवार्य आहे. कोणताही मागासवर्गीय विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहू नये, याची दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले असून, शिष्यवृत्तीपासून विद्यार्थी वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित शाळ–ेवर राहील. कार्यशाळेच्या ठिकाणाच्या नियोजनाची जबाबदारी संबंधित गटशिक्षण अधिकारी यांची राहील, असे जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण अधिकारी गिता गुठ्ठे यांनी कळविले आहे.

# मुख्यमंत्र्यांच्या आश्वासनानंतर सविता क्यातमवार यांची माघार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ डिसेंबर**

वसमत नगर पालिका निवडणुकीत नगराध्यक्षपदासाठी अपक्ष म्हणून सौ सविता क्यातमवार यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता परंतु मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची नागपुर येथे डॉ मारोती क्यातमवार यांनी भेट घेतली. यावेळी स्थानिक नेतेही उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी पुढील योग्य वेळी संधी देण्याचे आश्वासन डॉ क्यातमवार यांना दिल्यानंतर क्यातमवार यांनी भाजपचेच काम करणार असल्याचे सांगत त्यांची पत्नी सविता क्यातमवार यांचा नगराध्यक्षपदासाठी दाखल केलेला उमेदवारी अर्ज मागे घेतला आहे.



वसमत येथे कॉंग्रेस पक्षातून शिंदेसेनेत प्रवेश केलेल्या डॉ मारोती क्यातमवार यांना पालिका निवडणुकीत शिंदेसे–नेने नगराध्यक्षपदासाठी संधी दिली नाही. त्यामुळे त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. या निवडणुकीत त्यांनी त्यांची पत्नी सौ सविता क्यातमवार यांचा भाजपकडून उमेदवारी अर्ज दाखल केला. मात्र पक्षाचा एबी फॉर्म वर दुसऱ्या क्रमांकावर नाव असल्यामुळे त्यांनी अपक्ष म्हणून निवडणुक लढविण्याची तयारी चालवली होती.

दरम्यान, वसमत शहरात डॉ क्यातमवार यांना मोठे पाठबळ आहे. त्यांनी निवडणुकीत अपक्ष उमेदवारी कायम ठेवल्यास त्याचा भाजपला फटका बसण्याची शक्यता वर्तवली जात होती. त्यामुळे भाजपचे जिल्हाध्यक्ष गजान–नराव घुगे, आ. तान्हाजीराव मुटकुळे, शिवदास बोड्डेवार यांनी डॉ क्यातमवार यांच्याशी चर्चा करून त्यांना थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसुलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घडवून आणली. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी पुढील योग्य वेळी संधी देण्याचे आश्वासन दिल्यानंतर त्यांनी पत्नीचा उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच निवडणुकीत भाजपचेच काम करणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

# मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची वंचीतची ग्रामपंचायतीकडे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**औंढा नागनाथ, ९ डिसेंबर**

तालुक्यातील शिरड शहा–पूर ग्रामपंचायत हद्दीत मोकाट कुत्र्यांचा उपद्रव दिवसेंदिवस वाढत चालला असून या कुत्र्यांम–ुळे लहान मुलांपासून महिलांपर्यंत अनेकजण भयभीत झाले आहेत. गेल्या सहा महिन्यांत मोकाट कुत्र्यांच्या हल्ल्यात लहान मुलं, वृद्ध आणि महिलांना दुखा–पती झाल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. या पार्श्वभूम–ीवर वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अनिल कांबळे यांच्या नेतृत्वाखाली ग्रामविकास अधिकारी यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात स्पष्ट करण्यात आले की, स्थानिक प्रशास–नाने अद्याप मोकाट कुत्र्यांच्या बंदोबस्तासाठी कोणतीही ठोस उपाययोजना केलेली नाही.




लवकरात लवकर मोकाट कुत्र्यांवर नियंत्रण आणण्यासाठी उपाययोजना करण्यात आल्या नाहीत, तर वंचित बहुजन आघाडी शिरड शहापूर येथे तीव्र आंदोलन छेडणार असल्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

## संक्षिप्त वृत्त

### वंदे मातरम् गीताच्या वर्धापन दिनानिमित्त वर्षभर कार्यक्रम राबविण्याचे निर्देश

हिंगोली– केंद्र शासनाच्या मार्गदर्शनानुसार वंदे मातरम् गीताच्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त राज्यात वर्षभर विविध उपक्रम राबविण्यात येणार असून, त्यासाठी जिल्हा प्रशासनाने संबंधित विभागांना आवश्यक ती तयारी करण्याचे निर्देश दिले आहेत.बंकिम चंद्र चट्टोपाध्याय यांनी रचलेल्या 'वंदे मातरम्' गीताला स्वातंत्र्य चळवळीत विशेष स्थान असून, भारतीय जनतेला प्रेरणा देण–ारे हे गीत ७ नोव्हेंबर १८७५ रोजी लिहिले गेले असे मानले जाते. १८९६ मध्ये गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांनी भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या कलकत्ता अधिवेशनात हे गीत प्रथम गायले. स्वातंत्र्य संग्रामाच्या अनेक ऐतिहासिक क्षणांमध्ये या गीताने राष्ट्रीय भावना जागृत केल्या. २४ जानेवारी १९५० रोजी संविधान सभेत तत्कालीन राष्ट्रपती डॉ.राजेंद्र प्रसाद यांनी वंदे मातरम् ला राष्ट्रगीतातील 'जन गण मन' प्रमाणेच सन्मानाचा दर्जा असल्याचे जाहीर केले आहे. केंद्र शासनाच्या सूचनेनुसार हा उपक्रम ७ ते १४ नोव्हेंबर २०२५, १९ नोव्हेंबर २०२५ ते २६ जानेवारी २०२६, ७ ते १५ ऑगस्ट २०२६ (हरघर तिरंगा अभियान) व १ ते ७ नोव्हेंबर २०२६ (समारोप) या चार टप्प्यांमध्ये राबविण्यात येणार आहे.

### शिरड शहापूर येथे प्लास्टीक मुक्त अभियान



औंढा नागनाथ– तालुक्यातील शिरड शहापूर येथे ग्रामपंचायतीच्यावतीने प्लास्टीक मुक्त अभियान राबवण्यात आले. यावेळी सरपंच जितेंद्र रावले यांच्यासह ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत सदस्य यांनी गावातील घरोघरी जाऊन प्लास्टीकमुळे होणारे दुष्परिणाम सांगितले तसेच गावातील प्लास्टीक एकत्र करीत स्वच्छता अभियान राबवले. यावेळी गावातील सर्व दुकानदारांना प्लास्टीकमुक्त अभियानाला सहकार्य करण्याचे आवाहन केले. तसेच प्लास्टीकचा वापर करू नये असे आवाहनही केले. यावेळी गावकऱ्यांनीही स्वच्छता अभियानास सहभाग घेत प्लास्टीकमुक्त गाव करण्याचा संकल्प केला.

### संत संताजी जगनाडे जयंतीनिमित्त अभिवादन

हिंगोली– संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती आज जिल्हाधिकारी कार्यालयात साजरी करण्यात आली.जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित कार्यक्रमात संत संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेला आज अपर जिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपजिल्हाधिकारी (सामान्य) अनिल माचेवाड यांच्यासह उपस्थित अधिकारी –कर्मचाऱ्यांनी प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

# गणेशपूर येथील शेतकऱ्याची कर्जाला कंटाळून आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ डिसेंबर**

वसमत तालुक्यातील गणेशपूर येथे नापिकी आणि कर्जाला कंटाळून शेतकऱ्याने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी वसमत ग्रामीण पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्युची नोंद करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार गणेशपूर येथील शेतकरी सखाराम वाघमारे वय ४३ यांना त्यांच्या नावे ७२ गुंठे शेत आहे. या शेतीवरच त्यांच्या कुटुंबियांचा उदरनिर्वाह चालत होता. या शेतीवर त्यांनी वसमत येथील भारतीय स्टेट बँक शाखेतून सुमारे ८० हजार रूपयांचे पीककर्ज काढले होते. याशिवाय बचतगटाची काही रक्कमदेखील उचलली होती.

मात्र यावर्षी अतिवृष्टीमुळे शेतातील पिके खरडून गेली. त्यामुळे कर्ज कसे फेडायचे यांची चिंता त्यांना सतावत होती. त्यामुळे मागील काही दिवसांपासून ते अस्वस्थ होते. दरम्यान, घरातील सर्व मंडळी शेतात गेली असतांना त्यांनी राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. त्यांची पूतनी शाळेतून घरी आल्यानंतर तिला हा प्रकार लक्षात आला. तिने तातडीने आरडाओरड करून मदत मागितली तसेच शेतातील कुटुंबाला माहीती दिली. या घटनेची माहीती मिळताच सहायक पोलिस निरीक्षक गजानन बोराटे, सपाउपनि एस एम कांबळे, आंबादास विभुते, विजयकुमार उपरे यांच्या पथकाने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. मयत सखाराम वाघमारे यांच्या पश्चात पती, दोन मुले असा परिवार आहे. याप्रकरणी ओमकार वाघमारे यांच्या माहीतीवरून वसमत ग्रामीण पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. जिल्ह्यात कर्जबाजारीपणामुळे तसेच नापिकीमुळे शेतकऱ्यांचे आत्महत्येचे सत्र चालूच असल्याचे दिसत आहे. पुढील तपास उपनि कांबळे हे करीत आहेत.

# घरकुल, हमी योजनेतील जबाबदारी निश्चित करणारा अध्यादेश जारी करण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ डिसेंबर**

राज्यात घरकुल योजना व हमी योजनेमध्ये जबाबदारी निश्चित करणारा अध्यादेश जारी करण्याच्या मागणीसाठी महाराष्ट्र विकाससेवा संवर्गातील अधिकाऱ्यांनी सामुहीक रजा आंदोलन सुरू केले आहे. जिल्हा परिषदेअंतर्गत सर्व अधिकारी सहभागी झाल्यामुळे सर्व विभागातील प्रस्ताव स्वाक्षरी अभावी धुळखात पडले आहेत.

राज्यात घरकुल व हमी योजनेमध्ये जबाबदारी निश्चित करणारा अध्यादेश स्पष्ट झालेला नसल्याचे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. घरकुल योजनेत ग्रामसभेने निवडलेला लाभार्थी नंतर अपात्र ठरणे, लाभार्थ्यांनी घरकुलाचे बांधकाम न करता तसेच जुने घर दाखवून लाभ मिळवणे, घरकुल योजनेत प्रत्येक तालुक्यात मंजूर घरकुलांची संख्या मोठ्या प्रमाणावर असून प्रत्येक काम गटविकास अधिकाऱ्यांना पाहणे शक्य नाही त्यामुळे केवळ डिजीटल स्वाक्षरीच्या आधारावर गटविकास अधिकाऱ्यांना जबाबदार धरणे अन्यायकारक आहे. त्यामुळे या सर्व बाबींसाठी गटविकास अधिकाऱ्यांना जबाबदार धरू नये. याशिवाय महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये देखील अशीच परिस्थिती असून त्यामुळे या दोन्ही योजनेमध्ये जबाबदारी निश्चित करणारा अध्यादेश जारी करणे आवश्यक आहे. यामागणी संदर्भात शासनाकडे निवेदन देण्यात आले आहे. या आंदोलनात जि प चे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर ठोंबरे, प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी समृध्दी दिवाणे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी केशव गड्डापोड, उपमुख्य कार्यकारी अधिकारी संजय कुलकर्णी, गटविकास अधिकारी प्रफुल्ल तोटेवाड, अमितकुमार मुंडे, सुरेश कांबळे, गोपाल कल्हारे, गणेश बोथीकर, सुनील अंभुरे यांच्यासह अधिकाऱ्यांनी सामुहीक रजा आंदोलन सुरू केले आहे.

# डेंटल महाविद्यालयातर्फे जिल्हा परिषद शाळेतील २६९ विद्यार्थ्यांची मोफत दंत तपासणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ डिसेंबर**

शहरालगत असलेल्या अंतूलेनगर येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत मराठी पत्रकार संघ आणि डेंटल कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाणे सोमवारी दंत तपासणी शिबीर घेण्यात आले. यावेळी २६९ विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली.



मराठी पत्रकार संघ हा दर वर्षी जिल्ह्यात लोकोपयोगी कार्यक्रम राबवीत असतो, त्यानुसार यंदा तालुक्यातील अनेक शाळेत दंत तपासणी शिबीरे घेण्यात आली. त्यानुसार सोमवारी अंतूलेनगर येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत राज्यात अग्रस्थानी अस–लेली मराठी पत्रकार संघ आणि डेंटल कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने राबवीण्यात आलेल्या दंत तपासणी शिबिरात शाळेतील २६९ विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली. यावेळी मराठी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष प्रद्यूम्न गिरीकर, जिल्हा कार्याध्यक्ष मदन शेळके, विलास जोशी,चंदू वैद्य, यांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक गणेश कऱ्हाळे, प्रवीण रुईकर, प्रभाकर घुगे,राजेश बरडे, अरुण कांबळे, शालेय समितीचे अध्यक्ष माधव भवर, सदस्य विनोद बांगर, मनोज लिंबेकर, पांडुरंग सोमटकर, अनिता घोंगडे, प्रज्ञा घोडके, अश्विनी निकम, अनिता संगेवार, नीलिमा बंडाळे, आदींची उपस्थिति होती.

यावेळी डॉ. हेडगेवार रुग्णांलयातील डेंटल महाविद्यालय येथील इंटरशिप करणारे सायली हराळ, रोहिणी राऊत, मेघा गोरे, विशाल जगताप, निलेश हटकर, श्रेयस जगताप, ज्योती राऊत, शुभांगी सानप, नागेश काकडे यांनी विष्यार्थ्यांच्या दातांची तपासणी केली. यावेळी दात स्वच्छ धुणे, हिरड्या, आदी बाबत मार्गदर्शन केले. चॉकलेट, आईस्क्रीम, आदी थंड पदार्थ दाताच्या सुरक्षेसाठी टाळणे अशी माहिती दिली.

# ११ डिसेंबरला उमेद कर्मचारी हिवाळी अधिवेशनात उपोषणाला बसणार

**हिंगोली, ९ डिसेंबर**

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत कार्यरत गाव पातळीवरील एकूण कार्यरत ५२ हजार समुदाय संसाधन व्यक्ती तर सद्यस्थितीत अभियानांतर्गत कार्यरत एकूण २८०० कंत्राटी कर्मचारी त्यांच्या मागण्या मान्य व्हाव्यात यासाठी नागपूर येथे होणाऱ्या हिवाळी अधिवेशनात ११ डिसेंबर २०२५ पासून राज्यातील सर्व ग्रामीण भागातील उमेद अभियानातील महिला, कॅडर व कर्मचारी सह कुटुंब उपोषणाला बसणार असल्याचे निवेदन ग्राम विकास मंत्री यांना दि. ५ डिसेंबर रोजी देण्यात आले.

गेल्या वर्षभरापासून उमेद महिला व कर्मचारी कल्याणकारी संघटना महाराष्ट्र राज्य यांच्याकडून विविध मागण्या शासनाकडे रेटून धरल्या आहेत. मागील नऊ महिन्यात ग्रामविकास मंत्री, जयकुमार गोरे यांची भेट घेऊन मागण्या मान्य करण्याबाबत ग्राम विकास मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली २ बैठका झालेल्या असून सकारात्मक चर्चा करण्यात आली होती. परंतु अद्यापही संघटनेच्या मागण्या मान्य झाल्याचे शासन निर्णय व अंमलबजावणी झालेली नाही. त्यामुळे संघटना तब्बल किमान २ लाख महिला, केडर व कर्मचारी यांच्या उपस्थितीत आंदोलनच्या पवित्र्यात आहे. मागण्या मान्य न केल्यामुळे संघटनेने दिनांक १० डिसेंबर २०२५ पर्यंत शासन निर्णय न मिळाल्यास नागपूर येथे उपोषण, धरणे आंदोलनाचा इश–ारा दिला आहे. हिंगोली जिल्ह्या–तून महिला व कर्मचारी ७५०० जाण्याची तयारी आहे.



नांदेड- शहरात ठिक-ठिकाणी रस्त्यांची कामे सुरु असुन ही कामे अत्यंत संथ गतीने होत आहेत. शहरातील या अर्धवट कामांमुळे पोलीस वाहनाचा श्रीनगर मार्गावर अपघात झाला. वाहन थेट दुभाजकावर चढले. सुदैवाने कुठलीही हानी झाली नाही.

# वखार गोदामपालाची थेट मंत्र्याकडे तक्रार

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. ९ डिसेंबर-**

कृषि उत्पन्न बाजार समिती, किनवटचे सभापती गजानन गोविंदराव मुंडे यांनी राज्याचे पणनमंत्री जयकुमार रावल यांना सविस्तर निवेदन देत वखार महामंडळाच्या किनवट-वाई (बा.) गोदामातील मोठ्या गैरव्यवहारां विषयी माहिती देऊन तातडीने चौकशीची मागणी केली आहे. सभापती मुंडे यांनी आपल्या अधिकृत लेटरहेडवर पाठविलेल्या तक्रारीत या दोन्ही ठीकाणी कार्यरत व प्रभारी गोदामपाल अर्जुन शंकरराव भांगे यांच्यावर अनेक गंभीर आरोपांची मालिका उघड केली आहे.

तक्रारीनुसार, अर्जुन भांगे हे सातआठ वर्षांपासून किनवट व वाई (बा.) गोदामात कार्यरत असून त्यांनी रुजू झाल्यानंतर सर्वप्रथम जुने वॉचमन कामावरून कमी केले. कंत्राटदार कंपनीशी संगनमत करून स्वतः चे नातेवाईक नामदेव इंगोले तसेच गावातील सतीश कांबळे यांची वॉचमन म्हणून नियुक्ती करण्यात आल्याचा आरोप मुंडे यांनी केला आहे.



सभापती मुंडे यांनी तक्रारीत म्हटले आहे की, गोदामपाल भांगे यांनी खरेदी केंद्रांवर ५१ किलोची शासकीय अट सांगून अधिक सोयाबीन उचलून ठेवली, पण शेतकऱ्यांना कमी पावती देऊन उरलेला माल रात्रीच्या वेळी ३०० ते ५०० क्विंटलपर्यंत विक्री केल्याचा गंभीर आरोप आहे. ही विक्री त्यांच्या नातेवाईकांच्या माध्यमातून केल्याचेही पत्रात नमूद आहे. तक्रारीनुसार, भांगे यांनी छठउक्र खरेदी केंद्रांवर रिझेक्ट करण्याचे अधिकार वापरण्याची धमकी देऊन दर क्विंटल १० रुपये वसुली करून लाखो रुपयांची उघड उघड वसुली केली.

किनवट व शनिवारपेठ गोदामातील तूर खरेदीतही गंभीर गैरव्यवहार झाल्याचा उल्लेख तक्रारीत आहे. तूर निकृष्ट व जुनी असूनही गोदामात जमा केल्याची, तसेच ५१ किलो प्रमाणे माल ठेवून शेतकऱ्यांना कमी पावती देऊन उरलेला माल बाजारात विकण्यात आल्याची माहिती सभापती मुंडे यांनी मांडली आहे.

या सर्व गैरव्यवहारांकडे वरिष्ठांच्या डोळ्यासमोरून दुर्लक्ष होत असल्याचा उल्लेखही तक्रारीत असून, गोदामपाल भांगे हे दरवर्षी वरिष्ठ अधिकाऱ्यांना हप्ते देतात, त्यामुळे त्यांची बदली होत नाही, असा गंभीर आरोप सभापती मुंडे यांनी केला आहे. शासनाच्या नियमांनुसार तीन वर्षांनी बदली आवश्यक असते, तरीही त्यांचीच नेमणूक कायम असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सभापती मुंडे यांनी या सर्व प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून गोदामपाल अर्जुन भांगे यांना तात्काळ निलंबित करण्याची तसेच संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांवरही कारवाई करण्याची मागणी पणनमंत्री रावल यांच्याकडे केली आहे. तसेच किनवटवाई गोदामासाठी नवीन गोदामपालाची नियुक्ती करण्यात यावी, अन्यथा स्वतःला उपोषण आणि आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशाराही त्यांनी निवेदनात दिला आहे.

या तक्रारीची प्रत पणन संचालक, वखार महामंडळ पुणे, विभागीय व्यवस्थापक लातूर, छ. संभाजीनगर विभाग तसेच नांदेड येथील संबंधित कार्यालयांना पाठविण्यात आली आहे. या तक्रारीमुळे वखार महामंडळातील भ्रष्टाचाराचे पुन्हा एकदा पडसाद उमटले असून, या गंभीर आरोपांची राज्य शासनाकडून पुढील कारवाई काय होते याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान वरिल आरोपा संदर्भात वखार महामंडळाचे गोदामपाल अर्जुन शंकरराव भांगे यांच्यादुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधत प्रतिक्रीया घेण्याचा प्रयत्न केला असता त्यांचा संपर्क होऊ शकला नाही.

## संसदीय अभ्यासवर्गासाठी विद्यापीठाचा विद्यार्थी संघ नागपूरला रवाना

**नांदेड** -नागपूर येथे दिनांक ९ ते १३ डिसेंबर २०२५ दरम्यान विधान भवनात आयोजित करण्यात आलेल्या ५१ व्या संसदीय अभ्यासवर्गात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा विद्यार्थी संघ सहभागी झाला आहे. या अभ्यासवर्गाचे उद्घाटन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार असून या कार्यक्रमाला राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार तसेच एकनाथ शिंदे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.




या विद्यापीठाच्या विद्यार्थी संघाचे नेतृत्व प्रा. डॉ. कल्पना कदम, उपप्राचार्य, नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय, नांदेड यांनी केले आहे. त्यांच्या सोबत विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून कु. स्नेहा कदम, कु. अश्विनी माने, राम पेटेकर, अक्षय सोळंके आणि विकास कणाके हे सहभागी झाले आहेत. संसदीय अभ्यासवर्ग हा विद्यार्थ्यांना लोकशाहीची कार्यपद्धती, विधानसभेचे कामकाज, संसदीय परंपरा आणि राज्य कारभारातील निर्णयप्रक्रियेचे प्रत्यक्ष ज्ञान देणारा महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. नागपूर येथे होणाऱ्या या अभ्यासवर्गात राज्यातील विविध विद्यापीठांचे विद्यार्थी सहभागी होणार असून त्यांना संसदीय कार्यप्रणालीचे सखोल प्रशिक्षण मिळणार आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा संघ या महत्त्वपूर्ण उपक्रमात सहभागी होत असल्याने विद्यार्थ्यांना लोकशाही मूल्यांची ओळख, संसदीय परंपरांचे आकलन आणि नेतृत्वगुण विकसित करण्याची संधी लाभणार आहे. हा उपक्रम विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागामार्फत आयोजित केला जात आहे. या अभ्यासवर्गात सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे व संघ व्यवस्थापकाचे अभिनंदन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. डी. डी. पवार, अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, अधिष्ठाता डॉ. खडके, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. हुशारसिंग साबळे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजेश्वर दुडूकनाळे, क्रीडा संचालक डॉ. भास्कर माने, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. मारोती गायकवाड तसेच जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम यांनी केले आहे.

## मुदखेड तहसील कार्यालयात संताजी जगनाडे महाराज यांची जयंती साजरी

**मुदखेड** -मुदखेड येथील तहसील कार्यालयात तेली समाज बांधव, महसूल प्रशासन आणि पत्रकारांच्या उपस्थितीत संत संताजी जगनाडे महाराज यांची ४०१ वी जयंती मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. तहसील कार्यालयात दि. ८ डिसेंबर रोजी सकाळी ११:०० वाजता नायब तहसीलदार संतोष कामठेकर यांच्या शुभहस्ते संत संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करण्यात आले. नायब तहसीलदार पाठे यांनी जगनाडे महाराजांच्या कार्याची माहिती सांगून त्यांच्या विचारांवर आधारित आचरण करण्याचे आवाहन केले. यावेळी नायब तहसीलदार संतोष कामटेकर,नायब तहसीलदार पाटे, नायब तहसीलदार समीर पोवणे, शाम चौधरी, गोविंद पानसरे,विनायकराव वच्छेवार, ईश्वर पिन्नलवार, राम कूलूपवार, चंद्रकांत पिन्नलवार,गंगाधर पंगिरवार, शंकरराव पंगीरवार, शिवाजी पिनलवार,बालाजी आजगुळकर,शैलेश पंगिरवार, महेश पिनलवार, पत्रकार रूकमाजी शिंदे, प्रल्हाद मस्के,धम्मदाता कांबळे, अब्दुल रजाक यांच्या सह महीला कर्मचारी व तेली समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वानरांचा बंदोबस्त करण्याची मागणी

**माहूर**-तालुक्यातील टाकळी येथे गेल्या पंधरा दिवसांपासून एका पिसाळलेल्या वानरासह जंगली धान्यांची टोळी गावासह शेत शिवारात प्रचंड धुमाकूळ घालत असून नागरिकांवर हल्ले करणे, मालमत्तेचे नुकसान करणे या सह इतर उपद्रव माजविल्याने ग्रामस्थांसह सरपंच आणि ग्रामसेवक यांनी माहूर वन विभागाला निवेदन देऊन या वानरांचा तात्काळ बंदोबस्त करण्याची मागणी केली आहे. साधारणपणे पंधरा दिवसांआधी मौजे टाकळी गावात अचानकपणे जंगली वानरांच्या झुंडीचा शिरकाव झाला. त्यापैकी एक वानर पिसाळल्यासारखे वागत असून शेतात काम करणारे महिला मजूर वर्ग, शाळेत जाणारी लहान मुले तसेच वृद्ध नागरिकांवर हल्ले करत असून त्याच्या हल्ल्यात आजपर्यंत जवळपास १५ नागरिक जखमी झाले असल्याचे निवेदनात लिहिले आहे. या हल्ल्यात अनुचित घडण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने नागरिकांनी हैदोस घालणाऱ्या या वानरासह संपूर्ण टोळीचा तातडीने बंदोबस्त करण्याची गरजेचे झाले आहे. आधीच बिबटे, रानडुकराचा प्रचंड त्रास असलेले शेतकरी या वानराच्या उपद्रवामुळे वैतागले असून या वानरास पकडण्यास गेलेल्या नागरिकांवरही हा वानर रागात हल्ले करत असल्याने सदरील वानराचा तात्काळ बंदोबस्त करावा अशी मागणी टाकळी गावच्या ग्रामस्थांसह सरपंच, ग्रामसेवक यांनी निवेदनाद्वारे माहूर वनपरिक्षेत्र अधिकारी रोहित जाधव यांचेकडे केली आहे.

## नोटरी असोसिएशन सचिव संतोष जोंधळे यांचा शुक्रवारी पदग्रहण सोहळा

**नांदेड** -महाराष्ट्र अँड गोवा नोटरी असोसिएशनचे नांदेड जिल्हा शहर सचिव ड.संतोष जोंधळे यांचा राज्याचे अध्यक्ष सय्यद सिकंदर अली बार कौन्सिल चे नांदेड जिल्हा अध्यक्ष आशिष गोधमगावकर यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवारी पदग्रहण सोहळा आयोजित करण्यात आला आहे. यावेळी जिल्ह्यातील सर्व नोटरी बांधवांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. शुक्रवार दिनांक १२ डिसेंबर रोजी दु. २ वाजता जिल्हा सत्र न्यायालयाच्या अभिवक्ता संघाच्या कक्षात पदग्रहण सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या पदग्रहण सोहळ्यासाठी राज्याचे अध्यक्ष सय्यद सिकंदर अली हे आवर्जून उपस्थित राहणार आहेत.

# कडाक्याच्या थंडीतही आनंदाची उब; हरभरा पिकांची उत्तम वाढ



**आनंदा सुर्यवंशी**
**नायगाव, दि. ९ डिसेंबर-**

सध्या राज्यात सर्वत्र थंडीचा कडाका जाणवत असताना,नायगांव तालुक्यांमध्ये मात्र या गुलाबी थंडीचा रब्बी हंगामातील पिकांना,विशेषतः हरभऱ्याला, मोठा फायदा होताना दिसत आहे.निसर्गाचा हा 'वरदहस्त' मिळाल्याने नायगांव आणि नरसीसह परिसरातील गावची शिवारे रब्बी हंगामातील पिका ने हिरवेगार झाले असून,शेतकऱ्यांच्या मनाला रब्बी हंगामातील सुगीचे भावनिक संकेत मिळत आहेत.

वातावरणातील सुखद थंडीच्या गारव्यामुळे हरभरा पिकाची वाढ अपेक्षेपेक्षा उत्तम झाली आहे.पिकांवर कुठेही रोगराईचा प्रादुर्भाव दिसत नसून, केवळ निरोगी वाढच नव्हे, तर सध्या फुलोरा धरण्याची प्रक्रियाही मोठ्या प्रमाणात सुरू झाली आहे.शेताच्या बांधा वरून जाताना हरभरा डोलणारे हिरवे पीक पाहणा ऱ्यांच्या मनाला एक वेगळीच शांतता, समाधानाचा स्पर्श करून जात आहे.

सध्याचे हवामान यंदाच्या रब्बी हंगामातील हरभरा पिकांसाठी अत्यंत पोषक असल्याचे तालुक्यातील येथील कृषी तज्ज्ञांचे मत आहे. थंडीमुळे जमिनीतील ओलावा दीर्घकाळ टिकून राहतो, ज्यामुळे पिकाला आवश्यक पाणी सहज उपलब्ध होते. तसेच, संतुलित तापमान फुलांचे शेंगांमध्ये रूपांतर होण्यास मदत करते.

या अनुकूल परिस्थितीमुळे नायगांव तालुक्यातील नरसी सह ,होटाळा,कांडाळा, धानोरा,मरवाळी तांडा मूगांव सहा अन्य गावातील शेतकरी बांधवांच्या चेहऱ्यावर मोठे समाधान पसरलेले दिसत आहे. जर हेच पोषक हवामान असेच कायम राहिले, तर या वर्षी हरभऱ्याचे विक्रमी आणि भरघोस उत्पादन मिळण्याची दाट शक्यता वर्तविली जात आहे. निसर्गाच्या या कृपेमुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थिती त सुधारणा होण्याची आशा पल्लवित झाली असून, संपूर्ण नायगांव तालुक्यातील शेतकरी वर्गात सध्या आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण असल्याचे स्पष्ट चित्र पाहायला मिळत आहे.

# वाळू चोरी करणारे ट्रॅक्टर, ट्रॉलीसह मुरूम वाहतूक करणारा हायवा पकडला;

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. ९ डिसेंबर-**

माहूरचे तहसीलदार अभिजित जगताप यांनी तालुक्यात अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक करणाऱ्या विरोधात धडक आणि कडक कारवाईचा बडगा उचलला असून,दोन दिवसांत वाळूची चोरटी वाहतूक करणारे ट्रॅक्टर व ट्रॉली आणि मुरुमाची वाहतूक करणारा हायवा पकडत तीन मोठ्या कारवाया केल्याने गौण खनिज तस्करांमध्ये खळबळ माजली आहे.

माहूर तालुक्यातील पैनगंगा नदीपात्रातील पाचही वाळू घाटाच्या लिलावात कोणत्याही ठेकेदाराने वाळूची बोली बोलून महसूल न भरल्याने तहसील प्रशासनाकडून पुन्हा लिलाव प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. परिणामी कैक कालावधी पासून वाळू अभावी सर्वसामान्यांचे घर बांधकामासह इतर बांधकाम ठप्प झाले आहे. या संधीचा फायदा घेऊन काही वाळू तस्कर अवैधरित्या नाल्यातून वाळू चोरी करून दामदुप्पट दराने वाळू विक्री करण्याच्या तयारीत असल्याची माहिती तहसीलदार अभिजीत जगताप यांना मिळाल्याने त्यांनी दि.८ डिसेंबर रोजी मध्यरात्रीच्या सुमारास नायब तहसीलदार कैलास जेठे, पोउपनि संदीप अन्येबोईनवाड यांचे सह कर्मचाऱ्यांचे संयुक्त पथकाद्वारे धाडसी कारवाई करत एक ट्रॅक्टर वाळू भरून जात असताना पकडला तर दुसऱ्या कारवाईत नाल्यावर ट्रॉली लावून वाळू भरत असलेली ट्रॉली जप्त करण्यात आली. तर आज दि.९ रोजी विनापरवानगी मुरमाची वाहतूक करणारा हायवा पकडता.लगातार दोन दिवसांत अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक विरोधात तीन धडाकेबाज कारवाया केल्याने अचानक खळबळ माजली असून,वाळू तस्करांसह इतर गौण खनिजाची चोरी करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

माहूर तालुक्यातील पैनगंगा नदी पात्रातील वाळू घाटाची लिलाव प्रक्रिया आधीच कैक कालावधी पासून रखडलेली त्यात जैसे तैसे झालेल्या लिलाव बोलीत बोली व महसूल भरनाअभावी पूढे ढकलण्यात आली. त्यामुळे या वाळूचे जतन करणे क्रमप्राप्त असल्याने जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलीस अधीक्षक अविनाश कुमार, सहाय्यक जिल्हाधिकारी जेनीत चंद्रा दोन्तूला, उपविभागीय पोलीस अधिकारी किरण कुमार भोंडवे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार अभिजीत जगताप, पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांनी महसूल आणि पोलिसांचे संयुक्त पथक स्थापन करून पैनगंगा नदी पात्रावरील सर्व वाळू घाटावर करडी नजर ठेवली आहे.

त्यामुळे वाळू तस्करी पूर्णपणे बंद असून काही वाळू तस्कर नाल्यातील वाळू तस्करी करण्याचा प्रयत्न करत असल्याची माहिती मिळत असल्याने तहसीलदार अभिजीत जगताप, नायब तहसीलदार कैलास जेठे हे स्वतः दि.०८ रोजी रात्री ११ वाजता गस्तीवर असताना अंजनखेड ते रूपानाईक तांडा या रस्त्यावर पथकास सोनालीका ट्रॅक्टर मध्ये वाळू भरून जात असल्याचे दिसून आल्याने त्यांनी त्यास अडविले असता चालक ट्रॅक्टर थांबवून पसार झाला. त्या ट्रॅक्टरला माहूरच्या तहसील कार्यालयात आणून जमा करण्यात आले. तर दुसऱ्या घटनेत अंजनखेड ते नाईकवाडी रस्त्यावरील नाल्यावर एका ट्रॉलीत मजूर वाळू भरत असलेले दिसल्याने तेथे वाहन थांबवून बघितले असता मजुरांनी पोबारा केला. यावेळी दुसऱ्या ट्रॅक्टरचे मुंडके लावून सदरील ट्रॉली माहूर तहसील कार्यालयात जमा करण्यात आली. तर तिसऱ्या घटनेत दि.०९ रोजी पालाईगुडा फाटा येथे विनापरवानगी मुरमाची वाहतूक करत असलेला एक हायवा आढळून आल्याने त्या हायवा वाहनालाही माहूरच्या तहसील कार्यालयात आणून जमा करण्यात आले आहे. सदरील धाडसी कारवाईत पोका ज्ञानेश्वर खंदाडे, महसूल सहाय्यक मनोहर चेके, सुनील वणवे, डी.वाय. एरडलावार, सी.पी.बाबर, सुमित नैताम, ग्राम महसूल अधिकारी बंडू चिरंगे, लक्ष्मण मेश्राम, सुमित नैताम, प्रदीप कदम, विवेक नागपुरे, पवन पाटील यांचे सह या कारवाईत सर्व महसूल अधिकारी, कर्मचारी, कोतवाल यांनी सहभाग घेतला.

# मुदखेड पोलीस व महसुल विभागकडून अवैध रेती उत्खनन करणारे साहित्य नष्ट

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. ९ डिसेंबर-**

पोलिस अधिक्षक आबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली मुदखेड पोलिस ठाण्याचे पोलिस निरिक्षक धीरज चव्हाण, सहाय्यक पोलिस निरिक्षक शिवाजी शिंदे,पोहेकाँ चक्रधर, पोकाँ पुणेबोईनवाड,व महसुल विभाग यांच्या सयुक्त कार्यवाहीत अवैद्य रेती उत्खनन करणारे दोन फायबर बोट, आणि दोन वाळू उपसा करण्यासाठी लागणारे इंजन असलेली बोट असे एकुण ४२ लाख रुपयाचे साहित्य नष्ट करण्यात आले.



अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड यांनी पोलीस निरीक्षक धिरज चव्हाण यांना अवैद्य धंदे व अवैद्य वाळू उपसा करणाऱ्या विरूध्द माहीती काढुन केसेस करणे बाबत आदेशीत केले होते. त्यावरून दि.८ डिसेंबर रोजी पोलीस स्टेशन मुदखेड व महसुलविभाग यांचे पथक तयार करुन पथकांनी गुप्त बातमीदाराकडुन माहिती घेवुन मौजे खुजडा येथील स्मशानभुमी जवळ गोदावरी नदीपत्रात अवैद्य वाळू उपसा करणारे नमुद साहीत्य मिळून आल्याने तलाठी विश्वनाथ बोधमवाड यांनी पंचनामा केला. सदरचा मुद्देमाल हा आवजड असल्याने व नदीपात्रातुन बाहेर काढणे अशक्य असल्याने जिलेटीनच्या सहाय्याने ब्लास्ट करून नष्ट करण्यात आला आहे. गुन्हयातील तीन आरोपी फरार असुन त्याचा शोध घेवुन अटक करणे आहे. सदर गुन्हयाचा तपास पोहेकॉ चक्रधर हे करीत आहेत. याप्रकरणी मुदखेड पोलिसात २२३/२०२५ कलम ३०३(२),६२,३ (५) भा.न्या.सं. सह महाराष्ट्र महसूल अधिनियम १९६६ कलम ४८(७)४८,(८) कलमाद्वारे गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे. वरील कार्यवाही करणारे पोलीस अधिकारी व अमलदार यांनी केलेल्या कामगीरीचे अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड यांनी कौतुक केले आहे.

## मोफत आरोग्य शिबीरास प्रतिसाद

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. ९ डिसेंबर-**

मुख्यमंत्री समृद्ध ग्रामपंचायत अभियानांतर्गत ग्रामपंचायत येवली तालुका हदगाव येथे दि.८.१२.२०२५ रोजी आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरास नांदेड येथील रेणुकाई मल्टीस्पेशालिस्ट हॉस्पिटल नांदेड, भगवती मल्टीस्पेशालिस्ट हॉस्पिटल, ,सहयोगमल्टीस्पेशलिस्ट हॉस्पिटल, नांदेड क्रिटिकल केअर हॉस्पिटल, क्षितिज मल्टी स्पेशालिस्ट हॉस्पिटल, अपेक्षा मल्टी स्पेशालिस्ट हॉस्पिटल नांदेड यांनी येवली तालुका हदगाव येथे आरोग्य शिबिराचे कॅम्प आयोजित केला होता एवढ्या मोठ्या प्रमाणात पहिल्यांदाच ग्रामीण भागात आरोग्य शिबिराचे आयोजन झाल्यामुळे येवली परिसरातील आंदवाडी ,येवली तांडा ,कोका तांडा, आष्टी ,उमरी ,वायपना, पिंपळगाव ,राजवाडी ,घोगरी या गावातील गरजू लोकांनी या शिबिरामध्ये येऊन उपचार घेतल्यामुळे तसेच गंभीर आजार असलेल्या लोकांना नांदेड येथे पुढील शस्त्रक्रिया व ऑपरेशन करण्यात येणार आहेत त्यामुळे गरीब व गरजू लोकांना या शिबिराचा लाभ झाल्यामुळे त्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे भाव दिसू लागले. या शिबिरामध्ये जवळपास ५०० रुग्णांना तपासण्यात आले आहे. अशाप्रकारे नियोजन केल्यामुळे येणाऱ्या रुग्णांनी व डॉक्टर च्या चमूने सरपंच कंठाळे यांचे आभार मानले. अशाप्रकारे हे आरोग्य शिबिर यशस्वी करण्यासाठी गजानन कंठाळे, उपसरपंच सोनटक्के, दत्ता कवळे, नितीन साखरे, तंटामुक्ती अध्यक्ष गंगाधर महाराज , ग्रामपंचायत सदस्य मुकिंदा नरवाडे , मारुतराव सातलवाड, बालाजी तमलवाड,ऑपरेटर बालाजी पांडे, पाणीपुरवठा कर्मचारी यलकधरे, ग्रामपंचायत सेवक पंडित, या सर्वांनी कार्यक्रम यशस्वी साठी परिश्रम घेऊन कार्यक्रम यशस्वी केला.

## दिव्यांग दिन साजरा

**तभा वृतसेवा**
**उमरी, दि. ९ डिसेंबर-**

उमरी शहरातील निवाशी मुकबधीर विद्यालय येथे राष्ट्रीय दिव्यांग दिन साजरा करण्यात आला.

प्रथम हेलन केलर यांच्या प्रतिमेची पुज्या मान्यवराच्या हस्ते करण्यात आले प्रभात फेरी काढण्यात आली.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष माधव रामा जामलवाड हे होते. मुख्याध्यापक प्रा.द्रोणाचार्य यांनी दिव्यांग राष्ट्रीय दिन चे महत्व पटवुन सांगीतले. यावेळी विद्यार्थाना खाऊ वाटप करण्यात आले, क्रिडा स्पर्धा , रांगेळी चित्रकला स्पर्धा घेण्यात आले . उपस्थित मान्यवर गव्हाणे जेई , कांबळे एस आर , बैनवाड व्ही , मरेवाड व्ही ए , सौ . बाळाबाई पांढरे , राठोड आर के .या मेळास दिव्यांग विद्यार्थी व पालक वर्ग आणी शहरातील प्रतिष्टीत व्यक्ती उपस्थित होते .

# अ.ब.क.ड. उपवर्गीकरणसाठी आ. अंतापुरकरांनी वेधून घेतले राज्यशासनाचे लक्ष

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. ९ डिसेंबर-**

महाराष्ट्रातील अनुसूचित जाती (डउ) प्रवर्गातील ५९ उपजातींमध्ये निर्माण झालेल्या असमान प्रगतीच्या पार्श्वभूमीवर अ. ब. क. ड. आरक्षण उपवर्गीकरणाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. सध्या काही निवडक उपजातींना शिक्षण व नोकरीतील आरक्षणाचा अधिक लाभ मिळाल्याने आजही काही घटक या संधीपासून वंचित आहेत. त्यामुळे सामाजिक न्यायासाठी अ.ब.क.ड. उपवर्गीकरण तात्काळ लागू करावे, अशी महत्वपूर्ण मागणी आ. जितेश अंतापुरकर यांनी सध्या चालू असलेल्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात अनोख्या पद्धतीने केली आहे. दरम्यान अंतापुरकरांनी राज्यशासनाचे लक्ष वेधून घेतले आहे.




यासंदर्भात राज्य सरकारने बदर समितीची नियुक्ती केली असली तरी अहवाल सादर करण्यात होणारा विलंब हा निराशाजनक आहे. यामुळे समाजात असंतोष निर्माण होत आहे. विद्यार्थ्यांपासून रोजगार शोधणाऱ्या युवकांपर्यंत, शेतकरी कुटुंबांपासून सर्वसामान्य घटकांपर्यंत उपवर्गीकरण न लागू झाल्याने मागास घटकांना सरसकट आरक्षण यंत्रणेत मागे पडावे लागत असल्याचे चित्र सध्या तयार झाले आहे.

या पार्श्वभूमीवर देगलूर बिलोली विधानसभेचे आ. जितेश अंतापुरकर यांनी नागपूर येथे चालू असलेल्या हिवाळी अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली आहे. समाजाच्या वतीने आमदार अंतापुरकर म्हणाले की, अ. ब. क. ड. आरक्षण उपवर्गीकरणाचा निर्णय आता विलंब न लावता घ्यावा. अत्यंत मागास उपजातींना न्याय, प्राधान्य आणि त्यांना हक्काचा लाभ मिळवून देणे ही सरकारची जबाबदारी आहे. बदर समितीने घेतलेला कालावधी पुरेसा झाला असून अहवाल तातडीने सरकारसमोर यावा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असलेल्या आरक्षणातून सर्व घटकांचा विकास हेच केंद्रबिंदू होते. पण सध्या उपवर्गीकरण अभावी आजही काही घटक वंचित राहत असतील, तर त्यांच्या न्यायासाठी मी शेवटपर्यंत लढणार असल्याचे मत अंतापुरकर यांनी स्पष्ट केले.

दरम्यान विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे यांनीही अ.ब.क.ड उपवर्गीकरण लागू लागू करण्यासंदर्भात आपली भूमिका मांडली असून यावेळी त्यांची उपस्थिती होती. अनुसूचित जाती (डउ) प्रवर्गातील सर्व उपजातींना समान संधी मिळण्यासाठी उपवर्गीकरण ही काळाची गरज असल्याचा ठाम सूर आता समाजातील सर्व स्तरातून उमटू लागला आहे. सरकारने याबाबत तातडीचा निर्णय घेतल्यास हजारो युवक-युवतींच्या भविष्याला नवा दिशा व वेग मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.